सत्यमेव जयते

अनुसूचित जमाती कल्याण समिती

(२०१७ -२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

नागपूर व अकोला येथील जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच शासकीय यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यांत येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबतचा अहवाल

सहावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक मार्च, २०१८ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
मार्च, २०१८

अनुसूचित जमाती कल्याण समिती

(२०१७ -२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

नागपूर व अकोला येथील जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच शासकीय यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यांत येणाऱ्या योजनांबाबतचा अहवाल

सहावा अहवाल

एचबी ३२०६–१

अनुसूचित जमाती कल्याण समिती
(२०१७-२०१८)

समिती प्रमुख :

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

सदस्य :

**(२) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(३) श्री. पास्कर धनारे, वि.स.स.
(४) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(५) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.
(६) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
(७) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.
(८) श्री. अमित घोडा, वि.स.स.
(९) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.
(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
*(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
(१२) श्री. गोपिकिसन बाजोरिया, वि.प.स
(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१४) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
(१५) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव
(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

टिपः-

*(१) मा. अध्यक्षांनी श्री.पांडुरंग बरोरा, वि.स.स. यांची दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी रिक्त असलेल्या जागेवर समिती सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.

**(२) मा. अध्यक्षांनी, श्री. डॉ. देवराव होळी, वि.स.स. यांच्याऐवजी श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स. यांची दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नियुक्ती केली आहे.

अनुसुचित जमाती कल्याण समिती
(२०१५-२०१६)

समिती प्रमुखः-

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स.

सदस्यः-

(२) प्रा डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.
(५) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(६) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(७) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(८) प्रा. चंद्रकात सोनवणे, वि.स.स.
(९) श्री काशिराम पावरा, वि.स.स.
(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(११) श्री. पांडुरंग बरोरा , वि.स.स.
(१२) श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स.
(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१४) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.
(१५) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

*(१) मा. सभापती यांनी श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांची मुदत दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी संपुष्टात आल्याने व ते पुन्हा विधानपरिषदेवर निवडून आल्याने दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी त्यांची पुन्हा समितीवर समिती सदस्य म्हणून फेरनियुक्ती केली आहे.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विषय (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	**सात**
(१)	जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर येथील कर्मचाऱ्यांची जात प्रमाणपत्र पडताळणी विषयक प्रकरणे	१
(२)	जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथील रिक्त असलेली पदे	७
(३)	जिल्हा परिषद, नागपूर या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची जात पडताळणी विषयक प्रकरणे	८
(४)	जिल्हा परिषद, नागपूर कार्यालयातील रिक्त असलेली पदे	१९
(५)	जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथील रिक्त असलेली पदे	२४
(६)	जिल्हा परिषद, अकोला कार्यालयातील रिक्त असलेली पदे	२६
(७)	शिक्षण विभागांतर्गत उर्दु शिक्षकांची झालेली भरती	३०
(८)	जिल्हा परिषद कार्यालयात कार्यरत असलेल्या श्रीमती रंजना गेडाम यांच्यावर झालेला अन्याय प्रकरणी	३१
(९)	अपूर्ण असलेली रस्त्यांची कामे	३६
(१०)	शेतजमिनीचे शासनाला हस्तांतरण करणे	३७
(११)	एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत अपूर्ण असलेली कामे	३८

प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा सहावा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ या कालावधीतील अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक ७ ऑक्टोबर,२०१५ ते ९ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत नागपूर येथे व दिनांक २८ जानेवारी, २०१६ ते ३० जानेवारी, २०१६ या कालावधीत अकोला येथे भेट देऊन बैठका घेण्यात आल्या होत्या. उक्त बैठकींत जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी वर्गाची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच शासकीय व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्राअंतर्गत अनुसूचित जमातीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातंर्गत येणाऱ्या शासकीय/अनुदानित आदिवासी आश्रमशाळांना भेटी देऊन पाहणी केली. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्यांच्या अनुषंगाने समितीने दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी नागपूर व अकोला जिल्हा बैठकीसंदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचार विनिमय करून त्यासंदर्भात नोंदविलेले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

मंत्रालयीन विभागीय सचिवांनी तसेच इतर संबंधित अधिकाऱ्यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने दिनांक २० मार्च, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

विधान भवनः
मुंबई,
दिनांक : २० मार्च, २०१८

प्रा. डॉ. अशोक उईके,
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

अहवाल

जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

(१) जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची जात पडताळणीविषयक प्रकरणे.

अनुसूचित जमाती कल्याण समितीची दिनांक ७ ते ९ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच अनुसूचित जमातीच्या प्रवर्गासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनाची माहिती प्राप्त करण्यासाठी बैठक झाली. समितीने, दिनांक ७ ऑक्टोबर २०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणीविषयक प्रकरणांची माहिती घेत असताना जिल्हाधिकारी कार्यालयातील ६ प्रकरणे जात प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांच्याकडे सन २०१३ पासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणांबाबत विलंब लागण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता सहआयुक्त जात पडताळणी समिती, नागपूर, यांनी वरिष्ठ संशोधन अधिकारी यांची दोन्ही पदे रिक्त आहेत. यातील एक पद सन २०१२ पासून तर दूसरे पद जून २००५ पासून रिक्त आहे. त्याचप्रमाणे सहआयुक्त यांचे पद जुलै २०१५ पासून रिक्त आहे. अशी एकूण ९ अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत, यामध्ये प्रबंधक (रजिस्ट्रार) यांचे पद रिक्त आहे. भरारी पथकातील अधीक्षकाचे पद रिक्त आहे. त्यामुळे या प्रकरणांचा निपटारा करण्यास विलंब होत आहे. यासंदर्भात निवड समिती बसविण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे असे समितीला सांगितले. यावर समितीने, प्रलंबित प्रकरणांसंदर्भातील सविस्तर माहिती साक्षीच्या बैठकीत सादर करावी, असे निदेश दिले.

विभागीय सचिवांची साक्ष :—

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक ५ जुलै २०१७ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीला पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली.

तलाठी संवर्ग :—

(१) श्री. एच. एस. बेगडे, तलाठी यांना उ.वि.अ. उमरेड यांचे आदेश दिनांक ६ ऑक्टोबर २०१५ अन्वये शासन सेवेतून कमी करण्यात आलेले आहे.

(२) श्री. आर. एम. कच्छवाह, तलाठी यांना उ.वि.अ. उमरेड यांचे आदेश दिनांक ६ ऑक्टोबर २०१५ अन्वये शासन सेवेतून कमी करण्यात आल्यानंतर श्री. कछवाह यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे दाखल केलेल्या याचिकान्वये कायम ठेवण्यात आले आहे.

(३) श्री. एम. एस. भंदीर्गे, तलाठी, उप विभाग, नागपूर (ग्रामीण) यांनी जात वैधता प्रमाणपत्राकरिता दिनांक ६ फेब्रुवारी २०१६ रोजी पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

(४) श्री. पी. एच. परवरकर, तलाठी, उप विभाग, नागपूर (ग्रा.) यांनी जात वैधता प्रमाणपत्राकरिता दिनांक ६ फेब्रुवारी २०१६ रोजी पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

(५) श्री. पी. व्ही. सोनीवाले, तलाठी, उप विभाग, नागपूर (ग्रा.) यांनी जात वैधता प्रमाणपत्राकरिता दिनांक २६ सप्टेंबर २०१३ रोजी पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

(६) श्री. पी. व्ही. बुद्रुपे, तलाठी यांनी दिनांक २८ सप्टेंबर २०१३ रोजी पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

(७) श्री. व्ही. एस. बुधे, तलाठी यांनी दिनांक २८ सप्टेंबर २०१३ रोजी पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

लिपिक टंकलेखक व शिपाई संवर्ग :—

(१) श्रीमती एस.आर.तोडापे (मुकूलवार) लिपिक-टंकलेखक यांना आदेश दिनांक १४ डिसेंबर २०१५ अन्वये सेवामुक्त करण्यात आलेले होते. त्याविरुद्ध त्यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर येथे दाखल केलेल्या याचिकेनुसार न्यायालयाने दिनांक ३१ मार्च २०१६ अन्वये सेवेत पुनःस्थापित करण्याचे आदेश दिले आहे.

(२) श्रीमती जयश्री आतराम (मडावी) यांनी जात वैधता प्रमाणपत्र दिनांक २३ डिसेंबर २०१५ रोजी सादर केलेले आहे.

(३) श्री. टिकाराम बालाजी मौंदेकर, लिपिक-टंकलेखक यांनी जात वैधता प्रमाणपत्राकरिता दिनांक ४ जुलै २०१३ रोजी पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

(४) श्री. नरेंद्र दशरथ पाली, लिपिक-टंकलेखक यांनी जात वैधता प्रमाणपत्राकरिता दिनांक ४ जुलै २०१३ रोजी पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

(५) श्री. शुभग गादगे यांचा दावा अनु. जमातीच्या पडताळणी समितीचे आदेश दिनांक १९ डिसेंबर २०१६ अन्वये अवैध ठरविलेला असून त्याविरुद्ध त्यांनी मा. उच्च न्यायालय, खंडपीठ. नागपूर येथे याचिका दाखल केलेली आहे. सदर प्रकरणी शेवटची संधी दिलेली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(६) श्री. प्रेमलाल निखारे, शिपाई यांना दिनांक २३ सप्टेंबर २०१५ व १४ डिसेंबर २०१५ अन्वये कारवाईची नोटीस बजावण्यात आलेली होती. त्यांना दिनांक २१ एप्रिल २०१७ अन्वये शेवटची संधी देण्यात आलेली आहे.

वरीलप्रमाणे देण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने साक्षीच्या वेळी, तलाठी संवर्गातील भंदिरगे, परवरकर, सोनीवाले आणि बुद्रुपे यांच्या बाबतीत कोणती कारवाई केली, अशी विचारणा केली असता उप जिल्हाधिकारी नागपूर यांनी, या तीन कर्मचाऱ्यांचा नियुक्तीचा दिनांक ०५ जानेवारी १९९५ आहे. तो बिंदू रिकामा करून त्यांच्या सेवेला संरक्षण दिले आहे, असे समितीला सांगितले.

समितीचा दौरा ७, ८ व ९ ऑक्टोबर २०१५ मध्ये झाला होता. आता त्याला ९ महिन्यांचा कालावधी झाला आहे. ऑक्टोबर २०१६ मध्ये यासंबंधी चर्चा झाली होती आणि त्यानंतरही बिंदू रिक्त होण्यासाठी ९ महिन्यांचा कालावधी झालेला आहे. बिंदू रिक्त करण्यास विलंब लागण्याची कारणे काय यामध्ये सन १९९५ पूर्वीचे जे कर्मचारी आहेत ते संरक्षित आहेत. परंतु, सन १९९५ पूर्वीचे असल्यामुळे ते या बिंदूमध्ये बसत नाही, तो बिंदू तत्काळ रिक्त करायला हवा होता. मूळात १९९५ पासून हा बिंदू रिक्त झालाच नाही. एवढा उशीर झाल्यानंतर ऑक्टोबर २०१६ ला समितीने भेट दिली आहे. परंतु आता समिती आल्यानंतरही ९ महिन्यांचा कालावधी लागला आहे. म्हणजे दरम्यानच्या कालावधीत बिंदू रिक्त करून घेण्याचे काम करायला पाहीजे होते. त्याप्रमाणे कारवाई झालेली नाही. जर तो कर्मचारी १९९५ पूर्वीचा असेल तर त्याला संरक्षित करण्यात यावे आणि त्यानंतरचे जे असतील त्यांनी त्यांची पात्रता निश्चित करावी अन्यथा शासनाने त्यांना त्या पदावरून काढून बिंदू रिक्त करण्यात यावा. परंतु, त्यानंतर तो बिंदू रिक्त झालेला नाही.

समितीने लिपिक आणि टंकलेखक संवर्गात श्री. मोंदेकर आणि श्री. पाली यांच्या प्रकरणी कोणती कारवाई केली आहे, अशी विचारणा केली असता उप जिल्हाधिकारी यांनी श्री. मोंदेकर यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविण्यात आले आहे. परंतु त्यांच्या नियुक्तीची दिनांक १४ जून १९९४ आहे. त्यांना सुद्धा १९९५ पूर्वीचे असल्यामुळे संरक्षण आहे. पुढील भरतीच्या वेळेस त्यांचा बिंदू रिकामा करून कार्यवाही करण्यात येईल. यांच्या बाबतीत दिनांक ३१ मे २०१७ चे आदेश असून ते अलिकडेच प्राप्त झाले आहेत अशी माहिती दिली. त्यावर प्रधान सचिव,, महसूल यांनी श्री. मोंदेकरांच्या प्रकरणात त्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र दिनांक ३१ मे २०१७ रोजीच्या आदेशान्वये अवैध ठरविण्यात आले आहे. त्यानंतरची ही कार्यवाही आहे. त्यावेळी काही प्रकरणे अवैध ठरतील असे खात्रीशीररित्या सांगता येत नव्हते. परंतु जेव्हा प्रकरणे अवैध झाली तेव्हापासून पदे रिक्त करण्याची कारवाई करणे आवश्यक होते. जात प्रमाणपत्र पडताळणी होत असताना ती प्रकरणे जो पर्यंत अवैध ठरवित नाही तो पर्यंत बिंदू रिकामा करता येत नाही. या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना त्यांनी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र दिले होते म्हणून त्या आधारावर त्यांची नियुक्ती झाली होती. त्यांचे जात प्रमाणपत्र समितीपुढे गेले आणि समिती जो पर्यंत जात पडताळणी प्रमाणपत्र अवैध ठरवित नाही तो पर्यंत बिंदू रिकामा होणार नाही. जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यानंतर बिंदू रिकामा करण्यात येईल असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

त्यावर समितीने, अशी विचारणा केली की, दिनांक १८ मे २०१३ च्या शासन निर्णयामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, सरळसेवेमध्ये ज्या दिवसापासून नियुक्ती होते त्या दिवशी त्याची वैधता प्रमाणपत्र सादर करणे

किंवा त्याने ६ महिन्याची मुदत घेतल्या नंतर त्याचे जात वैधता प्रमाणपत्र त्याने स्वतः सादर करायचे आहे. अशाच प्रकारे पदोन्नतीमध्ये जो पर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर होत नाही तो पर्यंत कोणत्याही प्रकारे पदोन्नती देण्यात येऊ नये असे आदेश आहेत व या ठिकाणी त्यांनी वैधता प्रमाणपत्रासाठी सन २०१३ मध्ये प्रकरण पाठविले आहे म्हणजेच शासनाकडून किंवा त्या विभागाकडून निष्काळजीपणा झाला आहे. तसेच श्री. मोंदेकर यांनी जात वैधता प्रमाणपत्राकरिता दिनांक ४ जुलै २०१३ रोजी जात वैधता समितीकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सन २०१३ मध्ये प्रस्ताव सादर करीत असताना सन १९९५ चा आदेश असा होता की, सन १९९५ च्या पूर्वीची सर्व प्रकरणे या ठिकाणी संरक्षित आहेत. पण त्यापुढील प्रकरणात जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अपेक्षित होते. सन १९९४ पासून ते कामावर आहेत या संदर्भात कागदपत्रांची पूर्तता अद्यापपर्यंत का करण्यात आलेली नाही.

समितीने श्री. प्रेमलाल निखारे यांच्या प्रकरणी माहिती देण्यास सांगितले असता, उप जिल्हाधिकारी यांनी त्यांची नियुक्ती दिनांक १ डिसेंबर १९८४ ची आहे. दिनांक २३ मे २०१५ आणि दिनांक १४ डिसेंबर २०१५ अशी दोन वेळा त्यांना नोटीस दिलेली आहे. पण त्यांनी कुठल्याही प्रकारचा प्रतिसाद दिलेला नाही. त्यांची नियुक्ती सन १९९५ पूर्वीची असल्यामुळे त्यांचा जातीचा प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे सादर केला आहे. त्यांचा बिंदू सुद्धा रिक्त करून घेण्यात येईल. यावर जे सन १९९५ पूर्वीचे कर्मचारी आहेत आणि ज्यांनी प्रस्ताव सादर केलेले नाहीत किंवा कुठल्याही समितीकडे प्रलंबित नाहीत व प्रस्ताव सादर करीत नाहीत. त्यांच्या संदर्भात बिंदू रिक्त करण्याचा विषय आहे. परंतु त्यानंतर बिंदू रिक्त करणे अपेक्षित असताना देखील जिल्हाधिकारी कार्यालयाने कुठल्याही प्रकारची कारवाई केलेली दिसून येत नाही. त्यामुळे खऱ्या आदिवासींवर या ठिकाणी अन्याय होत आहे. गेल्या २५ ते ३० वर्षांपासून विभागाकडून या ठिकाणी अन्याय झाला आहे असे समितीला वाटते. कामकाजामध्ये दिरंगाई केल्या बद्दल जो काही निष्काळजीपणा झाला आहे त्या प्रकरणी लवकरात लवकर चौकशी करून कारवाई करण्यात येणार आहे काय. ही गंभीर बाब आहे, त्या ठिकाणी कारवाई होणे आवश्यक आहे. जाणीवपूर्वक या ठिकाणी त्रुटी आढळली आणि तरीही कारवाई होत नाही, असे मत व्यक्त केले.

समितीने श्री. शुभम गादगे यांचे प्रकरण अवैध ठरविले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. श्री. पी.व्ही. बुद्रुपे यांची दिनांक १३ डिसेंबर २०१२ ची नियुक्ती झाली आहे. सन २०१३ च्या शासन निर्णयानुसार कारवाई झालेली दिसत नाही. या प्रकरणी जात वैधता प्रमाणपत्राबाबत ६ महिन्यांची मुदत होती. त्या मुदतीत ते सादर न करता अद्यापही या ठिकाणी ते कोणत्या आधारावर कार्यरत आहेत अशी विचारणा केली असता, उप जिल्हाधिकारी यांनी जात पडताळणी समिती क्र. २ बाबत उच्च न्यायालयाचा आदेश आहे की, "The Respondent No-2; Caste Scrutiny Committee to take a decision on proposal in respect of verification of Caste Certificate in favour of the Petitioner pending with the Committee as expeditiously as possible, preferably within a period of one year from today.

Accordingly, it is directed that Respondents No-3 & amp; 4 shall not take any adverse action against the Petitioner until the disposal of validation Claim pending before the Committee." असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

समितीने, दिनांक १८ मे २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५ जून १९९५ पूर्वी नोकरीस लागलेल्या कर्मचाऱ्याचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास त्यांच्या सेवेस संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. मात्र अशा कर्मचाऱ्यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत त्या मागास प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ज्या कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा जात वैधता प्रमाणपत्र सादर करू शकत नाहीत अशा कर्मचाऱ्यांच्या सेवेस संरक्षण अनुज्ञेय नाही. अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५ जून १९९५ पूर्वी नोकरीस लागलेल्या अनेक कर्मचाऱ्यांनी जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्यासाठी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर केले नाही अथवा अन्य मागास वर्ग प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करून सेवेत संरक्षण मिळविले आहे अशा कर्मचाऱ्यांचे पूर्वीचे मूळ अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अधिनियम, २००० मधील कलम ७ च्या तरतुदीनुसार जप्त करण्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे. अशा कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र ज्या प्राधिकाऱ्याने दिली आहे त्या प्राधिकाऱ्याकडे दिनांक ३१ जुलै २०१३ पूर्वी जमा करावी व त्याबाबतची पोचपावती संबंधित कार्यालयाच्या आस्थापना अधिकाऱ्याकडे सादर करणे आवश्यक आहे. तसेच दिनांक ३० जून २००४ रोजीच्या शासन निर्णयात असे म्हटले आहे की, ज्या बिगर आदिवासींनी अनुसूचित जमातीच्या राखीव जागांवर दिनांक १५ जून १९९५ पूर्वी शासकीय किंवा निमशासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नती मिळविलेल्या आहेत त्यांना सेवेतून काढण्यात येवू नये किंवा पदावनत करु नये. त्यांना ते ज्या घटकाचे आहेत त्या घटकात दाखविण्यात यावे. यापुढे त्यांना त्या त्या घटकाचे आरक्षणाचे फायदे देय राहतील अशा प्रकारे रिक्त झालेली पदे आदिवासी जमातीमधून भरण्यात यावीत असे विभागीय प्रतिनिधींच्या निदर्शनास आणून दिले.

अभिप्राय व शिफारशीः

जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे कार्यरत असलेले संवर्गनिहाय कर्मचाऱ्यांची नियुक्ती सन १९९५ पूर्वीची असून या कर्मचाऱ्यांची अनेक प्रकरणे जात पडताळणी समितीकडे सन २०१३ नंतर सादर करण्यात आली आहेत. प्रलंबित प्रकरणांपैकी काही कर्मचाऱ्यांची प्रकरणे जात पडताळणी समितीने अवैध ठरविली आहेत. या निर्णयाविरूद्ध संबंधित कर्मचाऱ्यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका सादर केली. सन १९९५ पूर्वी सेवेत नियुक्त झालेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना सेवेत संरक्षण असले तरी त्यांनी शासन निर्णयान्वये जात वैधता प्रमाणपत्र किंवा अन्य मागास प्रवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र सादर करून अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करणे

आवश्यक आहे, परंतु या ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसून येत नाही. त्यामूळे आदिवासी समाजावर अन्याय झाला आहे.

ज्या कर्मचाऱ्यांची सन १९९५ पूर्वी अनुसूचित जमाती प्रवर्गातून सेवेत नियुक्ती झाली आहे, त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी जात वैधता पडताळणी समितीकडे सादर करण्यास १५ ते २० वर्षांचा कालावधी गेलेला आहे. याप्रकरणी पूर्णतः जिल्हाधिकारी कार्यालयातील सामान्य प्रशासन विभाग जबाबदार आहे. सबब, ज्या कर्मचाऱ्यांची प्रकरणे पडताळणी समितीकडे सादर करण्यास जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकरी व कर्मचाऱ्यांकडून विलंब झालेला आहे त्यांची चौकशी करून अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूद्ध तत्काळ कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

जात पडताळणी समितीने ज्या कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव अवैध ठरविले आहेत. त्याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पूढील कार्यवाही झालेली दिसून येत नाही, म्हणजेच संबंधित कर्मचाऱ्यांना पाठिशी घालण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. सबब, एखाद्या कर्मचाऱ्याचे प्रकरण अवैध ठरविण्यात आल्यानंतर या कर्मचाऱ्यांविरूद्ध त्वरित कारवाई होणे आवश्यक आहे. अशा प्रकरणी कार्यालयातील दोषी असणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

समितीने जात वैधता प्रमाणपत्रा संदर्भात असे निदर्शनास आणून दिले की, अलिकडे बनावट जात वैधता प्रमाणपत्रे दिली जातात. एखाद्याचे जात वैधता प्रमाणपत्र नवीन तंत्रज्ञानातून व्हाईट इंक वगैरे लावून तेच प्रमाणपत्र फेरफार करून स्वतःचे नाव त्या ठिकाणी टाकून दुसरा वापरतो आणि जात वैधता प्रमाणपत्र सादर करतो. नोकरीला लागल्यानंतर पुढील ६ महिन्यांत जात वैधता प्रमाणपत्रासाठी कागदपत्रे सादर केली जातात आणि त्यानंतर वर्षानुवर्षे निघून जातात त्यानंतर त्याची तक्रार आली की अडचण निर्माण होते. कारण या वेळेस त्या व्यक्तीची अर्ध्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण झालेली असते. जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्या प्रमाणपत्राची पुन्हा संबधित जात पडताळणी समितीकडून फेरतपासणी करून घेणे शक्य आहे काय हे पाहिले पाहिजे. एकाच प्रमाणपत्राचा इतरांनी वापर केल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे त्याची फेरतपासणी करण्यासाठी जी कार्यवाही करावयास हवी ती करण्यात यावी. यासाठी संबंधित जात पडताळणी समित्यांकडे पत्र व्यवहार करून त्या बाबतीत मार्ग काढण्यात यावा. अशा प्रकारे प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे फेरतपासणीसाठी पाठविले तर ते त्याच व्यक्तीचे आहे किंवा आधीचे नाव खोडून दुसऱ्याचे नाव घातले आहे याची तपासणी करून घेता येईल का अशी विचारणा समितीने केली असता आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पूणे यांनी समितीने उपस्थित केलेल्या सुचनेनूसार जात प्रमाणपत्राची फेरतपासणी करता येईल. आतापर्यंत जेवढी प्रकरणे आली

आहेत ती आपण जरी निकाली काढली असली तरी या अगोदरपासून जी प्रमाणपत्रे दिली असतील आणि ती प्रमाणपत्र पुन्हा समितीकडे फेरतपासणीसाठी आले तर त्यांची फेरतपासणी करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, समित्यांकडे जात पडताळणीचे प्रस्ताव गेल्यानंतर साधारणपणे १० ते १२ वर्षे त्यांच्याकडून त्या प्रमाणपत्रांची पडताळणी न होता ती प्रकरणे प्रलंबित राहतात समित्यांच्या कामासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करून दिल्यास वैधता प्रमाणपत्रांचे वाटप होण्यास निश्चितपणे मदत होईल. अन्यथा अशा पद्धतीने प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहतील आणि दरम्यानच्या काळात बोगस दाखले सादर करून अनुसूचित जमातीच्या जागेवर कायमस्वरूपी कर्मचारी कार्यरत राहतील.

ज्याप्रमाणे जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याची संबंधित कर्मचाऱ्याची जबाबदारी आहे तेवढीच जबाबदारी संबंधित जात पडताळणी समितीची सुद्धा आहे आणि कायद्यामध्ये यासंबंधी परिपूर्ण तरतुदी आहेत. त्यानुसार कारवाई होणे गरजेचे आहे. फक्त संबंधित कर्मचाऱ्याला जबाबदार धरता येणार नाही. याठिकाणी संबंधित जात पडताळणी समिती सूद्धा तेवढीच जबाबदार आहे असे समितीने मत व्यक्त केले.

जात पडताळणी समिती संदर्भात विशेष शिफारस :—

जात पडताळणी समितीकडून जात वैधता प्रमाणपत्रे दिली जातात. एखाद्याचे जात वैधता प्रमाणपत्र नवीन तंत्रज्ञानातून फेरफार करून त्या ठिकाणी अन्य कर्मचारी जात वैधता प्रमाणपत्र सादर करतो. अशा प्रकरणी एखाद्या कर्मचाऱ्याची तक्रार आली असल्यास प्रशासकीय अडचणी निर्माण होतात. कारण त्यावेळेस त्या कर्मचाऱ्याची सेवा अर्ध्यापेक्षा जास्त झालेली असते, अशा परिस्थितीत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्या प्रमाणपत्राची जात पडताळणी समितीकडून फेरतपासणी करणे आवश्यक आहे.

सबब जिल्ह्याच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या कार्यालयातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार सेवेत नियुक्ती झाल्यानंतर किंवा नियुक्तीच्यावेळी त्यांनी सादर केलेल्या जात वैधता प्रमाणपत्राबाबत कार्यालयीन अधिकाऱ्यांस काही चुका आढळल्यास सादर केलेल्या वैधता प्रमाणपत्राची तपासणी संबधित जात पडताळणी समितीकडून किंवा आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पूणे यांच्याकडून करण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

(२) जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर येथे रिक्त असलेली पदे :—

जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर येथे झालेल्या बैठकीच्या वेळी समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातील संवर्गनिहाय सरळसेवेने ४ पदांचा व पदोन्नतीने १२ पदांचा अनुसूचित जमाती प्रवर्गातील अनुशेष केव्हा पासून रिक्त आहे, रिक्त पदे केव्हा पर्यंत भरण्यात येतील अशी विचारणा केली असता जिल्हाधिकारी

यांनी अव्वल कारकून संवर्गातील पदोन्नतीची २४२ पदे मंजूर आहेत. यापैकी अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी १७ पदे राखीव असून ८ पदे भरलेली आहेत व ९ पदे रिक्त आहेत. सन २०१२-१३ मध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राखीव असलेली पदोन्नतीची ३ पदे व सन २०१३-१४ मध्ये २ पदे रिक्त होती. सन २०१३-१४ मध्ये ५ पदांपैकी २ पदे भरण्यात आली आहेत. पदोन्नती निवड समितीची बैठक घेण्यात आली होती. परंतु, पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे ३ पदांचा अनुशेष शिल्लक आहे असे समितीस विदित केले. यावर समितीने रिक्त पदे भरण्याची कार्यवाही पूर्ण करून समितीला अहवाल सादर करावा, असे निदेश दिले.

विभागीय सचिवांची साक्ष :-

दिनांक ५ जुलै २०१७ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने अनुसूचित जमाती प्रवर्गातून भरावयाचा अव्वल कारकून संवर्गातील पदोन्नतीचा किती अनुशेष आहे, अशी विचारणा केली असता उप जिल्हाधिकारी (प्रशासन) यांनी अव्वल कारकूनच्या एकूण १२ पदांपैकी ९ पदे पदोन्नतीचे भरावयाची होती. त्यांपैकी २ पदे पात्र उमेदवार व उपलब्ध न झाल्याने इतर ७ पदे रिक्त आहेत, त्यासाठी परीक्षा पास होणे आवश्यक आहे किंवा ३ वर्षांनंतर होणारी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे किंवा शिथिलतेच्या अटीतून सूट मिळणे आवश्यक आहे, असे समितीला सागितले.

अभिप्राय व शिफारशीः

जिल्हाधिकारी कार्यालयात अव्वल कारकून या संवर्गात पदोन्नतीने भरावयाची ७ पदे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यामूळे रिक्त आहेत. सदर पदोन्नतीकरिता आवश्यक असणारी विभागीय परीक्षा पास होणे किंवा शिथिलतेच्या अटीतून सूट मिळाल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या कर्मचाऱ्यांतून पदोन्नतीची पदे भरण्यात येतात. सबब, अव्वल कारकून या संवर्गातील पदोन्नतीकरिता नमूद करण्यात आलेली पात्रता पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून रिक्त असलेली ७ पदे तत्काळ भरण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

जिल्हा परिषद, नागपूरः-

(३) जिल्हापरिषद कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची जात पडताळणीविषयक प्रकरणे.

अनुसूचित जमाती कल्याण समितीची दिनांक ७ ते ९ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत नागपूर येथे बैठक झाली दिनांक ७ ऑक्टोबर २०१५ रोजी जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर या कार्यालयातील वर्ग ३ व वर्ग ४ मधील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची भरती, बढती, आरक्षण व जात पडताळणीविषयक संदर्भात अनुशेष तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रात जिल्हापरिषद यंत्रणाकडून राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनाबाबत दिलेल्या माहितीच्या आधारे समितीने बैठकीत आढावा घेतला.

समितीने जिल्हा परिषद कार्यालयातील किती कर्मचाऱ्यांची प्रकरणे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठविलेली आहेत, अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद यांनी विदित केले की जिल्हा परिषदेने एकूण १३७ कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव जात पडताळणीसाठी पाठविलेले असून त्यासंदर्भात वारंवार पडताळणी समितीस पत्रव्यवहार केला आहे. तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता प्रस्ताव जात पडताळणी समितीकडे प्रलंबित असल्याचे सांगण्यात येते.

समितीने जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचे काम हे संबंधित कर्मचाऱ्यांचे आहे. कर्मचारी जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करतात परंतु त्याचा पाठपुरावा करीत नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर व जात पडताळणी समिती, नागपूर यांनी समन्वय साधून प्रलंबित प्रस्तावांची यादी तपासून घ्यावी व समितीच्या आढावा बैठकीमध्ये त्याबाबतची सविस्तर माहिती समितीला सादर करावी, असे निदेश दिले.

समितीच्या झालेल्या आढावा बैठकीच्यावेळी मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर यांनी जिल्हा परिषदेतील १३७ प्रकरणे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर यांचेकडे ११९ प्रकरणे, गडचिरोली समितीकडे १ प्रकरण, अमरावती समितीकडे १४ प्रकरणे आणि नाशिक समितीकडे ९ प्रकरणे प्रलंबित आहेत असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

सहआयुक्त, अनुसूचित जमाती जात पडताळणी समिती यांनी जिल्हा परिषदेकडून प्रलंबित प्रकरणांची यादी प्राप्त झालेली आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे ६९ प्रकरणे प्राप्त झालेली आहेत. अपूर्ण नावामुळे प्रकरणे शोधता आली नाहीत अशी १९ प्रकरणे आहेत. २७ प्रकरणे समितीस प्राप्त झालेली नाहीत. समितीकडे ५७ प्रकरणे होती. त्यांपैकी १२ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. यापैकी १ प्रकरण वैध आणि ११ प्रकरणे अवैध ठरविण्यात आली आहेत. अवैध प्रकरणामध्ये श्रीमती चंद्रकला शंकर बाजीराव यांचे प्रकरण दिनांक २४ जुलै २०१५ रोजी अवैध ठरविण्यात आले आहे. श्री. घोडपागे टिकाराम महादेव यांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. श्रीमती मंगला सुरेश गिते यांचे प्रकरण दिनांक १३ फेब्रुवारी, १९९८ रोजी अवैध ठरविण्यात आले आहे. श्रीमती अल्का राजाराम बारापात्रे यांचे प्रकरण दिनांक २१ ऑक्टोबर २०१३ रोजी अवैध ठरविण्यात आले आहे. श्रीमती मंदाकिनी बाबुराव डेकाटे यांचे प्रकरण दिनांक २८ मे २०१४ रोजी अवैध ठरविण्यात आले आहे. श्रीमती विजया जामरावजी नेवारे यांचे प्रकरण दिनांक ६ जानेवारी, २०१२ रोजी अवैध ठरविण्यात आले आहे. श्री. राजू केशवराव इंजेवार यांचे प्रकरण दिनांक १६ ऑगस्ट २०१३ रोजी अवैध ठरविण्यात आले आहे. श्रीमती सिमा वासुदेवराव नंदनवार यांचे प्रकरण ३ मार्च, २०१५ रोजी अवैध ठरविण्यात आले आहे. श्रीमती कंचन आर्वीकर (वाघाडे) यांचे प्रकरण ०६ ऑक्टोबर २०१५ रोजी अवैध ठरविण्यात आले. श्री. सोनकुसरे करुणा चिंधुजी यांचे प्रकरण २१ ऑगस्ट १९९१ रोजी अवैध ठरविण्यात आले. श्रीमती प्रतिभा परसराम पाठराबे

यांचे प्रकरण ०३ मार्च २००१ रोजी अवैध ठरविण्यात आले. तसेच जिल्हा परिषदेची २७ प्रकरणे पडताळणी समितीकडें प्राप्त झालेली नाहीत. उर्वरित ५७ प्रकरणे पुढील ६ महिन्यात निकाली काढण्यात येतील, असे समितीला सांगितले. समितीने प्रकरण अवैध ठरविल्यानंतर त्याची प्रत जिल्हा परिषदेला पाठविल्याची एक प्रत जात पडताळणी समितीकडे आहे काय? कारण, जिल्हा परिषदेला प्रत दिली असेल आणि जिल्हा परिषदेने संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई केली नसेल तर ते दोषी आहेत. जिल्हा परिषदेला ११ कर्मचाऱ्यांची यादी द्यावी. जिल्हा परिषदेने त्यांच्यावर कारवाई करून समितीला अहवाल सादर करावा. तसेच, २७ कर्मचाऱ्यांची प्रकरणे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्राप्त झालेली नाहीत त्याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित कर्मचारी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रकरण पाठविल्याची पोहोच पावती देतात. त्याआधारे त्याची पुन्हा पडताळणी करून घेण्यात येईल, असे समितीला सांगितले.

समितीने, दिनांक १८ मे २०१३ नंतर नव्याने नियुक्ती झालेल्या १२ कर्मचाऱ्यांची यादी आपल्याकडे देण्यात आली होती. जात वैधता प्रमाणपत्र असल्याशिवाय नवीन नियुक्ती करू नये, असे शासन निर्णयात नमूद केलेले आहे. त्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती होऊन ६ महिन्यांचा कालावधी पूर्ण झालेला आहे. त्यानंतर संबंधित कर्मचाऱ्याला सेवा मुक्त करावे, असे शासन निर्णयात नमूद केले आहे, परंतु ६ महिन्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे संबधित कर्मचाऱ्यावर कारवाई करून समितीला अहवाल सादर करावा असे निदेश दिले.

सहआयुक्त जात पडताळणी समिती यांनी, जिल्हा परिषदेतील ११९ प्रकरणे नागपूर समितीकडे प्रलंबित आहेत. परंतु, २७ प्रकरणे समितीकडे प्राप्त झालेली नाहीत. समितीकडे ६९ प्रकरणे प्राप्त झालेली आहेत. जिल्हा परिषदेने दिलेली यादी तपासली आहे. त्यामध्ये १९ कर्मचाऱ्यांची नावे नाहीत. असेही समितीच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी संबंधित कर्मचाऱ्यांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रस्ताव दाखल केल्याची पोहोच पावती कार्यालयाकडे आहे. काही प्रकरणे सन १९९८ पासूनची आहेत. कर्मचाऱ्यांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे प्रकरण दाखल केलेले आहे. परंतु, समितीकडे प्रलंबित आहेत असे समितीला सांगितले.

समितीने, कर्मचाऱ्यास नियुक्ती मिळाल्यानंतर ६ महिन्यांच्या आत त्याने जात वैधता प्रमाणपत्र संबंधित कार्यालयास सादर करावयास पाहिजे, ही त्याची जबाबदारी आहे. जर त्याने जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर संबंधित विभागाने त्याच्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे. ज्या कर्मचाऱ्यास नियुक्ती मिळून ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झाला आहे व त्याने जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही, अशा कर्मचाऱ्यांच्या संदर्भात कारवाई करण्यात यावी.

तसेच जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या यादीमध्ये १९ प्रस्तावामधील नावे सापडलेली नाहीत. सदर प्रकरणी दोन्ही विभागांनी समन्वय साधून सदर प्रकरणातील १९ कर्मचाऱ्यांसबंधीचा खुलासा समितीस

सादर करावा. जात पडताळणी समितीस जिल्हा परिषदेच्या एकूण २७ कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत. तसेच, जात पडताळणी समितीने त्यांच्याकडे प्राप्त असलेल्या प्रस्तावांची माहिती समितीस सादर करावी. कर्मचाऱ्यांचे जात पडताळणीचे प्रस्ताव प्रलंबित राहत असतील तर ही अतिशय गंभीर बाब आहे, असे समितीने मत व्यक्त केले.

समितीने, दिनांक ५ जुलै २०१७ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी जिल्हापरिषद नागपूर कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार विभागनिहाय अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे १०५ प्रकरणे सादर केली त्यांपैकी ५१ प्रकरणी निर्णय झाला आहे व ५४ प्रकरणी पडताळणी समितीचा निर्णय प्रलंबित आहे. तसेच अन्य समितीकडे एकूण १८ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यामध्ये नाशिक-२ प्रकरणे, अमरावती-१२ प्रकरणे, गडचिरोली-३ प्रकरणे व औरंगाबाद-१ प्रकरण प्रलंबित आहे नागपूर जात पडताळणी समितीने अवैध ठरविलेल्या ११ प्रकरणापैकी ४ प्रकरणी अन्य मागास प्रवर्गाचे वैधता प्रमाणपत्र सादर करून अनुसूचीत जमातीचा बिंदू रिक्त करण्यात आला आहे. उर्वरित ७ प्रकरणाची पुढील प्रमाणे माहिती दिली.

(१) श्रीमती नंदनवार सिमा वासुदेवराव, शिक्षण सेवक म्हणून कार्यरत आहे. या कर्मचाऱ्याने सेवा संरक्षणाबाबत माननीय उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचीका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने दिनांक १५ फेब्रुवारी, २०११ च्या आदेशानुसार जात पडताळणी समितीला ६ महिन्याच्या आत निर्णय घेण्याबाबत निर्देश दिले होते आणि तोपर्यंत त्यांची सेवा अबाधीत ठेवण्याचे निर्देश आहेत. परंतु त्यांना अद्याप पर्यंत सेवेमध्ये नियमित केलेले नसून त्यांच्या सेवेला सहाय्यक शिक्षक म्हणून सेवा सातत्य देण्यात आलेले नाही. त्यानंतर त्यांनी सेवा सातत्य मिळण्यास्तव माननीय उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर येथे रिट याचिका दाखल केलेली आहे. सदर याचिकेचा निर्णय झालेला नसल्याने सदर प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

(२) श्रीमती कंचन आर्वीकर (वाघाडे), यांची नियुक्ती दिनांक २४ ऑगस्ट १९८४ असून त्यांचा अनुसूचित जमातीचा दावा पडताळणी समितीकडून दिनांक ६ ऑक्टोबर २०१५ रोजी अवैध ठरविण्यात आलेला आहे. त्यांची नियुक्ती १५ जून १९९५ पूर्वीची आहे. त्यांनी त्यांच्या जातीचे मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांना दिनांक २० एप्रिल २०१७ नुसार नोटीस बजावण्यात आलेली होती व दिनांक १५ जून २०१७ अन्वये अंतिम संधी देण्यात आली.

(३) श्रीमती गिते मंगला सूरेश, यांनी मा. उच्च न्यायालय नागपूर खंडपिठ येथे दाखल केलेल्या रिट याचिका नुसार यांच्या सेवेला दिनांक १६ डिसेंबर २०१५ चे न्यायालयीन निर्णयानुसार संरक्षण देण्यात आलेले आहे. त्याची प्रत कर्मचाऱ्याने विभागास सादर केलेली आहे.

(४) श्री. वंजारी सूरेश मुन्नाजी, यांची नियुक्ती दिनांक ८ जुलै १९९१ असून त्यांचे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र दिनांक ५ नोव्हेंबर २०१५ ला जात पडताळणी समितीने अवैध ठरविले आहे.

परंतु त्यांची नियुक्ती १५ जून १९९५ पूर्वीची आहे. दि. ३० जून २०१७ रोजी इतर मागास प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे.

(५) श्रीमती नेवारे विजया जानराव (कोकमवार), यांची नियुक्ती दिनांक १६ ऑगस्ट १९९७ आहे. जात पडताळणी समितीकडून दिनांक ६ जानेवारी २०१२ रोजी अवैध ठरविण्यात आलेले आहे. संबंधितांनी त्यांचे वि.मा.प्र. या प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र दि. ३१ जुलै २०१२ रोजी प्रशासनाला सादर केले. तसेच दिनांक २१ ऑक्टोबर २०१५ च्या शासन निर्णयान्वये व १० जून २०१७ च्या ग्राम विकास विभागाचे पत्रान्वये संबंधितास नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(६) पाठराबे श्रीमती. प्रतिभा परसराम, यांनी माननीय उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे दाखल केलेल्या रिट याचिका अन्वये यांच्या सेवेला दिनांक ०६ जानेवारी, २०१५ चे न्यायालयीन निर्णयानुसार संरक्षण देण्यात आलेले आहे.

(७) श्री. इंजेवार राजू केशवराव, यांची नियुक्ती दिनांक २१ नोव्हेंबर २००१ असून ते आजही शिक्षण सेवक म्हणून कार्यरत आहेत. जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामूळे त्यांना अद्यापही प्राथमिक शिक्षक या पदावर सेवा सातत्य देण्यात आलेली नाही. जात पडताळणी समितीकडून दिनांक ३१ ऑगस्ट २०१३ रोजी अनुसूचित जमाती प्रवर्गातील जातीचा दावा अवैध ठरविण्यात आलेला आहे. त्यांना सेवा समाप्त करण्याबाबत दिनांक २० एप्रिल २०१७ रोजी आणि दिनांक १५ जून २०१७ अन्वये अंतिम नोटीस देण्यात आलेली आहे.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने विभागनिहाय जात वैधता प्रमाणपत्राची १२३ प्रकरणे नागपूर जात पडताळणी समिती कार्यालयाकडे प्रलंबित होती, त्यांपैकी किती प्रकरणे निकालात निघाली आणि किती प्रलंबित आहेत? अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी प्रलंबित प्रकरणी आढावा घेतला त्याप्रमाणे १२३ प्रकरणे होती. जिल्हा परिषद नागपूर येथील १०५ प्रकरणे असून त्यांपैकी ५१ प्रकरणे प्राप्त झाली आणि ५४ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यांपैकी विभागनिहाय सामान्य प्रशासन विभागाकडे ५ प्रकरणे प्राप्त होती, त्यांपैकी ४ प्रकरणे वैध होती आणि १ अवैध होते. माननीय उच्च न्यायालयाचे आदेश आहेत की, त्यांची सेवा समाप्त करू नये. पंचायत विभागाची २ प्रकरणे प्राप्त होती, त्यांपैकी १ वैध होते आणि एका प्रकरणी माननीय उच्च न्यायालयाची इंटरिम स्टेटस-को ची ऑडर आहे. आरोग्य विभागात ४ प्रकरणे प्राप्त असून त्यांपैकी २ प्रकरणे वैध आणि २ अवैध आहेत. त्यातील एक प्रकरण दिनांक १५ जून १९९५ पूर्वीचे होते. त्या कर्मचाऱ्याचा विशेष मागास प्रवर्गामध्ये समावेश करण्यात आला असून अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करण्यात आला आहे. सिंचन विभागात २ प्रकरणे प्राप्त होती, त्यांपैकी १ प्रकरण वैध असून १ अवैध होते. या प्रकरणी त्यांनी न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. पशुसंवर्धन विभागात १ प्रकरण प्राप्त आहे. त्या कर्मचाऱ्याला एसबीसी वर्गवारीमध्ये समाविष्ट केले असून अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करण्यात आला आहे.

महिला व बालकल्याण विभागात १ प्रकरण प्राप्त झालेले असून ते अवैध होते. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ट असून उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार त्यांच्यावर कोणतीही दंडात्मक कारवाई करु नये, असे आदेश आहे. शिक्षण विभागात एकूण ३६ प्रकरणे प्राप्त असून त्या प्रकरणी कारवाई केलेली आहे. १२ प्रकरणे सन १९९५ पूर्वीची होती, त्यांना त्यांच्या प्रवर्गात सामावून घेतले व अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करण्यात आलेला आहे. शिल्लक २० प्रकरणे होती. त्यांना सेवा समाप्तीची नोटीस देण्यात आलेली असून सदरची प्रक्रिया सुरू आहे, असे समितीला सांगितले.

समितीने,ज्या २० कर्मचाऱ्यांना नोटिसा दिलेल्या आहेत त्यांची सद्यःस्थिती काय आहे? व नोटीस देण्यास एवढा विलंब लागण्याची कारणे काय, अशी विचारणा केली असता शिक्षणाधिकारी, प्राथमिक यांनी दिनांक २० एप्रिल २०१७ रोजी आणि दिनांक १५ जून २०१७ रोजी त्यांना नोटीसेस दिलेल्या आहेत. शिक्षण विभागात जात वैधताची ३६ प्रकरणे प्राप्त झालेली आहेत, त्यांपैकी ४ प्रकरणे वैध आहेत आणि ३२ प्रकरणे अवैध आहेत. सन १९९५ नंतरची ३ प्रकरणे असून २९ प्रकरणे १९९५ पूर्वीची आहेत. त्यांपैकी १२ लोकांचा बिंदू रिक्त करण्यात आलेला आहे. नैसर्गिक न्याय तत्वानुसार त्यांना सेवा समाप्तीच्या नोटीसेस देण्यात आल्या आहेत. या प्रकरणी विलंब झाला. येत्या एक आठवड्यात कारवाई पूर्ण करु, असे समितीला सांगितले.

समितीने, दिनांक ७ ते ९ ऑक्टोबर २०१५ रोजी नागपूर येथे भेट देऊन बैठक घेतली. आता त्या कर्मचाऱ्यांना नोटीसेस दिलेल्या आहेत. एवढा विलंब होण्याचे कारण काय आहे. समिती गेल्यानंतर दोन वर्षे त्यांनी वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही, अशा लोकांना ताबडतोब नोटीस द्यायला पाहिजे होती. तथापी जाणीवपूर्वक समितीचा अवमान केला आहे असे समितीने मत व्यक्त केले.

प्रधान सचिव,, ग्रामविकास विभाग, यांनी या कर्मचाऱ्यांना दिनांक १५ जून २०१७ पर्यंत मुदत दिलेली आहे. गेल्या दोन वर्षामध्ये काहीही झालेले नाही. त्या कर्मचाऱ्यांचे संरक्षण कसे केले असे कोठेही दिसत नाही. या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कडून ८ दिवसांत कारवाई करून केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविण्यात येईल, असे समितीला आश्वासित केले.

समितीने अनुसूचित जमाती कल्याण समिती ही अनुशेष व्यवस्थित भरला की नाही हे बघण्यासाठी आली होती. आदिवासी विकास विभागाला जो निधी मिळालेला आहे तो व्यवस्थित खर्च होतो की नाही, हे पाहण्याचे काम समिती करते. समिती सन २०१५ मध्ये येऊन गेलेली आहे तरीदेखील शिक्षण विभागाने कोठल्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. आता समिती साक्ष घेणार आहे म्हणून संबंधितांना नोटीसेस दिलेल्या आहेत, ही फार गंभीर बाब आहे. याप्रकरणी आता विभागीय सचिवांनी जबाबदारी घेतलेली असून त्यांनी कालावधी ठरवून दिलेला आहे. त्या कालावधीत कारवाई होते की नाही ते पाहून याप्रकरणी समितीकडून निर्णय घेण्यात येईल,

तसेच सचिव, ग्रामविकास विभाग यांच्या कडून प्राप्त झालेली दिनांक १५ जुलै २०१७ रोजीच्या पत्रान्वये असे नमूद केले आहे की, अनुसूचित जमाती कल्याण समितीची नागपूर जिल्हा परिषदेच्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक ५ जुलै २०१७ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी मा. सचिव, (ग्राम विकास विभाग) यांनी आश्वासित केलेली माहिती बाबतचा अंतरिम अहवाल प्रकरणी नागपूर जिल्हा परिषदने जात प्रमाणपत्र सादर न केलेल्या कर्मचाऱ्यां विरुद्ध ०८ दिवसांत कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. तथापि जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडून प्राप्त झालेला अहवाल व कागदपत्राचे अवलोकन केले असता सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १८ मे २०१३ च्या शासन निर्णयानुसार संबंधीत कर्मचाऱ्यां विरुद्ध कारवाई करावयाची आहे, त्या शासन निर्णयास जनहित याचिका ६९/२०१३ मध्ये दिनांक २४ जुलै २०१३ च्या अंतरीम आदेशामध्ये स्थगिती दिली आहे. अशा प्रकरणी संबधित कर्मचाऱ्यांविरुद्ध बडतर्फीची कारवाई करता येईल किंवा कसे याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करून घेण्यात येत आहेत. विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर संबंधीत कर्मच्याऱ्यांविरुद्ध शासन निर्णयात नमूद केलेल्या कार्यपद्धतीप्रमाणे कारवाई करण्यास दोन महिन्याचा कालावधी लागेल, अशी विनंती केली आहे.

समितीने, श्रीमती सिमा नंदनवार यांची नियुक्ती कधी झाली व त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र कधी अवैध झाले अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांनी श्रीमती सिमा नंदनवार यांची नियुक्ती दिनांक १२ डिसेंबर २००१ रोजी झाली होती. त्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. म्हणून त्यांना नोटीस देण्यात आली, त्यांच्याविरुद्ध त्यांनी माननीय उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली. माननीय उच्च न्यायालयाने सहा महिन्यांत जात पडताळणी वैध आहे की अवैध आहे त्याबाबत निर्णय घ्यावा, असे पडताळणी समितीला निर्देश दिले. त्यानंतर त्यांची जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी अवैध झाले. त्यानंतर त्यांनी कोर्टात याचिका दाखल केले सद्यस्थितीत ते प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. या प्रकरणी शेवटची संधी देण्यात आलेली आहे. दिनांक २० एप्रिल २०१५ रोजी माननीय उच्च न्यायालयाने निर्देश दिलेले आहेत. दिनांक ३ मार्च, २०१५ रोजी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र अवैध झाले, परंतु, तो विभागाला लगेच मिळाली नाही म्हणून त्यांच्यावर तत्काळ कारवाई झालेली नाही असे समितीला सांगितले. समितीने जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविल्यानंतर संबंधित विभागाकडून पत्र मिळण्यास विलंब झाला आहे का? जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरविल्यानंतर हे पत्र कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर दरम्यानच्या कालावधीत साधारणपणे ३३ दिवस धरले तर आपल्याकडे जवळपास १ महिन्याचा कालावधी होता. जात पडताळणी कार्यालयाकडून ते जात वैधता प्रमाणपत्र संबंधित कार्यालयाकडे पोहोचण्यासाठी २ ते ३ महिने लागतात. हे प्रकरण नागपूरचेच होते. त्यामुळे फार तर ८ दिवस लागू शकले असते. जात पडताळणी समिती च्या कार्यालयातून जिल्हा परिषद कार्यालयात येण्यासाठी १५ दिवस जरी धरले असले तरी १७ दिवस कार्यवाही करण्यासाठी उरले होते. त्यामुळे ही कार्यवाही का केली नाही. त्या व्यक्तीला कोर्टात जाण्यासाठी संधी दिल्याबद्दल जिल्हा परिषद कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी जबाबदार आहेत, असे समितीचे मत आहे.

प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग यांनी या प्रकरणामध्ये नक्की कोणत्या तारखेला इश्यू झाले ते तपासले पाहिजे. त्यांची चूक झाली की, जिल्हा परिषद कार्यालयाची चूक झाली हे तपासले पाहिजे. पण जर ते २ ते ३ महिने भेटत नसेल तर योग्य नाही. त्यांना जर त्यांचे प्रमाणपत्र अवैध ठरल्याचे उघडपणे माहिती झाल्यानंतर ते कोर्टात तातडीने जातील. या प्रकरणी पत्र निश्चितपणे कधी मिळाले व कोणाकडे विलंब झाला आहे. त्याची माहिती तपासून घेण्यात येईल, असे समितीला विशद केले.

सहआयुक्त, जात पडताळणी समिती नागपूर यांनी, समितीने भेट दिल्यानंतर जिल्हा परिषदेची ८६ प्रकरणे होती. त्यातील १२ वैध, ३४ अवैध, २ खारीज अशी मिळून एकूण ४८ प्रकरणे निकाली काढली आहेत. त्यामुळे समितीकडे एकूण ३८ प्रकरणे प्रलंबित आहेत. यांपैकी ३० प्रकरणे पोलीस दक्षता पथकाकडे दिलेली आहेत. त्याचप्रमाणे जवळपास ही सर्व प्रकरणे नामसदृश्याचा फायदा घेतलेली आदिवासींची प्रकरणे आहेत. जेन्युअन टाईपची ती प्रकरणे नाहीत. ८ प्रकरणांचे समितीपुढे पुढील १५ दिवसांत सुनावणी ठेवण्यात आली आहे. उर्वरित ३० प्रकरणे जी पोलीस दक्षता पथकाकडे आहेत त्यांची चौकशी करण्यासाठी वेळ लागणार आहे. समिती आल्यानंतर १२ वैध प्रकरणे होती तर ३४ प्रकरणे अवैध ठरली आहेत. पडताळणी समितीने विभागनिहाय काही प्रकरणे न्यायालयात आहेत. शिक्षण विभागाशी संबंधित २० प्रकरणांमध्ये सचिवांनी सांगितले आहे की, ८ दिवसांत त्यावरील कार्यवाही पूर्ण करून अहवाल समितीला सादर करण्यात येईल. ५४ प्रकरणांपैकी आता ३८ प्रकरणे नागपूर समितीकडे प्रलंबित आहेत. व इतर समितीकडे १६ प्रकरणे प्रलंबित आहेत. असे समितीच्या निदर्शनास आणून दिले. समितीने ज्यावेळी दौरा केला होता त्यावेळी अशा सूचना दिल्या होत्या की, जात पडताळणी समिती आणि जिल्हा परिषदेचे आस्थापना विभागाचे अधिकारी यांनी एकत्र बसून त्यांची शहानिशा करण्यात यावी असे निर्देश दिले होते.

समितीने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने दि. २० एप्रिल २०१७ ला आणि १५ जून २०१७ ला नोटिसा दिल्या आहेत. समितीला जाऊन जर दोन-दोन वर्षांनंतर प्रकरणांमध्ये शिक्षण विभाग नोटीस काढत असेल तर त्याला कोणताही अर्थ राहत नाही. शिक्षण विभागाने समितीचा आदेश असतानाही दोन-दोन वर्षे संबंधितांना नोटिसा काढल्या नाहीत. त्यामुळे शिक्षण विभागाबद्दल स्पष्ट शब्दात नाराजी आहे. याबाबत सचिवांनी जबाबदारी घेतलेली आहे आणि ते ८ दिवसांत ज्या २० लोकांना नोटिसा देण्यास विलंब झाला त्यांना नोटिसा देऊन केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करावा असे निदेश दिले.

सन २००१ पासून शिक्षक श्री. इंजेवार यांना नुसती नोटीस दिली जात आहे, पण त्याच्यावर कोणतीही कार्यवाही होत नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. तसेच समितीच्या जिल्हा बैठकीच्या वेळी १८ कर्मचारी दोषी आढळून आले होते व या १८ कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्याचे आदेश झाले होते. या कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेश काढले होते. तथापि, या प्रकरणी कोणती

कार्यवाही केली आहे असे समितीने विचारणा केली असता, प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, यांनी या १८ लोकांच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी आणि समितीला येत्या १०-१५ दिवसांत या १८ लोकांच्या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखी स्वरूपात कळविण्यात यावा अशी सूचना केली. समितीने इंजेवार यांची नियुक्ती दिनांक २९ नोव्हेंबर २००१ असून ते आजही शिक्षण सेवक म्हणून कार्यरत आहेत. जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांना अद्यापही प्राथमिक शिक्षक म्हणून सेवा सातत्य देण्यात आलेली नाही. जात वैधता समितीकडून दि. ३१ ऑगस्ट २०१३ रोजी नियुक्ती प्रवर्गातील दावा अवैध ठरविण्यात आला आहे. त्यांना सेवा समाप्त करण्याबाबत दिनांक २० एप्रिल २०१७ रोजी आणि दिनांक १५ जून २०१७ रोजी अंतिम नोटीस दिली आहे.

सन २०१३ मध्ये ते अवैध ठरले असताना त्यांना सन २०१७ मध्ये चार वर्षांनंतर नोटीस दिली आहे. आपण या प्रकरणी नुसती नोटीस न देता कार्यवाही करणे आवश्यक होते. श्री. इंजेवार यांची नियुक्ती १९९५ पूर्वीच्या परिपत्रकातही बसत नाही. त्यांना अवैध ठरविल्यानंतर केवळ नोटीसवर नोटीस देत असाल आणि प्रत्यक्ष कार्यवाही करीत नसाल तर यास कोणास जबाबदार धरायचे? अशी विचारणा केली असता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, यांनी या व्यक्तीवर पुढील ८ दिवसांत १०० टक्के कार्यवाही केली जाईल असे समितीला आश्वासित केले.

तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सामान्य प्रशासन विभागाचे ५ निर्णय प्राप्त होते, त्यांपैकी ४ वैध होते आणि १ अवैध होते. त्यामध्ये उच्च न्यायालयाने, "Not to terminate the services during the pendency." असा इंटेरिअम रिलिफ दिला आहे. नंतर पंचायत विभागाचे २ निर्णय प्राप्त होते त्यांपैकी १ वैध होता आणि १ अवैध होता पण त्यामध्येसुद्धा याचिका दाखल झालेली आहे असे समितीला सांगितले असता समितीने शिक्षण विभागाने २ वर्षांनंतर नोटिसा दिलेल्या आहेत. साक्षीला येताना पूर्णपणे अभ्यास करून यायला पाहिजे होते की, जात वैधता समितीकडे आपल्या विभागाचे किती प्रमाणपत्र सादर झाली आहेत. आकडेवारी समोर येत असताना इतर जातीच्या उमेदवारांची नावे किंवा त्यांची काही प्रकरणे वैधता प्रमाणपत्र समिती क्र. १, २, ३, या समितीकडे सादर केली आहे, अशा समित्या आदिवासी विभागाकडे अस्तित्वातच नाहीत. याची सर्व माहिती शिक्षण विभागाने घेऊन या ठिकाणी साक्षीला येणे अपेक्षित होते. असे मत व्यक्त केले.

प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी या ठिकाणी काही आकडेवारी सांगितली आहे, ती तपासून घेऊन जे २० लोक आहेत त्यांची प्रकरणे प्रथम तपासून घेण्यात येतील आणि त्यांच्याकडे जी पावती आहे ती पावती त्यांना १५ दिवसांत मिळाली की नाही हे खात्री करून यामध्ये कुणी चुकीची पावती दिली असेल तर त्यांच्या विरूद्ध गुन्हा दाखल करण्यात येईल. कारण पावती त्यांच्याकडे प्रथम सादर झालेली आहे असे समितीला सांगितले.

समिती गेल्यानंतर २ वर्षांनंतर हा प्रकार घडला आहे. मग आता आणखी वेळ न घालविता संबधीत कर्मचाऱ्यांनी किंवा अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केल्याबद्दल त्यांच्यावर किती दिवसांत कारवाई करणार आहात, अशी समितीने पुन्हा विचारणा केली असता प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी यामध्ये कायदेशीररित्या जर एखादी शिक्षा करायची असेल तर विभागीय चौकशी करावी लागेल. कारण विभागीय चौकशी त्यांचा अधिकार आहे. दंड आकारायचा असेल तर विभागीय चौकशीची गरज नाही. यामध्ये जो उशिर झाला आहे त्याबद्दल जर कोणाची मध्यस्थी दिसत असेल तर त्यांच्यावर कारवाई करून १५ दिवसांच्या आत समितीला अहवाल सादर करण्यात येईल असे, समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हा परिषद, नागपूर कार्यालयांत कार्यरत असलेल्या विभागनिहाय ११९ कर्मचाऱ्यांची प्रकरणे अनुसूचित जमाती जात पडताळणी समिती, नागपूर यांच्याकडे प्रलंबित असताना जात पडताळणी समितीला फक्त ६९ प्रकरणे प्राप्त झाली व २६ प्रकरणे समितीस प्राप्त झालेली नाहीत. अपूर्ण नावामुळे १९ प्रकरणे शोधता आली नाही असे बैठकीच्या वेळी सहआयुक्त, जात पडताळणी समिती यांनी निदर्शनास आणून दिले. सबब जिल्हाधिकारी कार्यालयातील पडताळणी समितीस प्राप्त न झालेल्या २६ प्रकरणांची व अपूर्ण नावांमुळे प्रकरणे शोधता आले नाही अशी १९ प्रकरणांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालय व जात पडताळणी कार्यालय यांनी समन्वयाने एकत्रितरित्या प्रलंबित असलेल्या प्रकरणी तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

जिल्हा परिषद कार्यालयातील ११ कर्मचाऱ्यांची प्रकरणे अवैध ठरविण्यात आली आहेत. अवैध ठरविण्यात आलेल्या प्रकरणांपैकी ४ प्रकरणी अन्य मागास प्रवर्गाचे वैधता प्रमाणपत्र सादर करून अनु. जमातीचा बिंदू रिक्त करण्यात आलेला आहे. संवर्गनिहाय रिक्त करण्यात आलेल्या बिंदूवर अनुसूचित जमाती प्रवर्गातून नवीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

उर्वरित ७ प्रकरणांपैकी श्रीमती सिमा नंदनवार, शिक्षण सेवक यांनी सेवा संरक्षणाबाबत मा. उच्च न्यायालयात याचिका सादर केली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जात पडताळणी समितीने ६ महिन्यांच्या आत निर्णय घेण्याबाबत निदेश दिले आहे. त्यानुसार जात पडताळणी समितीने श्रीमती सिमा नंदनवार यांच्या प्रकरणी त्वरित निर्णय देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

श्रीमती मंगला गिते व प्रतिभा पाठराबे यांच्या प्रकरणी न्यायालयाने संरक्षण दिले आहे. तथापि, या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या दिनांकान्वये शासन निर्णयानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. सबब न्यायालयीन प्रकरणी पाठपुरावा करून अनुसूचित जमातीच्या बिंदू रिक्त करण्याची तत्काळ कार्यवाही करण्यात यावी.

श्रीमती कंचन आर्वीकर, श्रीमती विजया नेवारे, श्री. सुरेश वंजारी या कर्मचाऱ्यांची नियुक्ती सन १९९५ पूर्वीची असल्याने या कर्मचाऱ्यांना सेवेत संरक्षण आहे. पडताळणी समितीकडे जात प्रमाणपत्र सादर केले असता त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने अवैध ठरविल्या नंतर या कर्मचाऱ्यांनी अन्य मागासप्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्यामुळे अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करून संवर्गनिहाय रिक्त झालेली पदे अनुसूचित जमाती प्रवर्गातून भरण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

श्री राजू इंजेवार, शिक्षण सेवक यांची दिनांक २१ नोव्हेंबर २००१ रोजी नियुक्ती झाली आहे. त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ३१ ऑगस्ट २०१३ रोजी अवैध ठरविण्यात आले आहे. प्रकरण अवैध झाल्यानंतर जिल्हा परिषद कार्यालयाने तत्काळ त्यांना सेवेतून मुक्त करणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे कारवाई झालेली नाही. सबब, दिनांक १८ मे २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार श्री. इंजेवार यांची नियुक्ती सन २००१ मध्ये झालेली असल्याने त्यांना त्वरित सेवामुक्त करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच श्री. इंजेवार यांचे जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ३१ ऑगस्ट २०१३ रोजी अवैध ठरविण्यात आलेले असताना जवळपास चार वर्षांपर्यंत त्यांना सेवेत ठेवण्यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांविरुद्ध तात्काळ कारवाई करण्यात यावी.

जिल्हा परिषद कार्यालयातील शिक्षण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या २० कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही. या कर्मचाऱ्यांना नोटिसा देऊन कारवाई करण्यात यावी असे समितीने जिल्हा बैठकीच्या वेळी निदेश दिलेले होते. तथापि, समितीच्या बैठकीनंतर या प्रकरणी कार्यवाही करण्यात आली नाही तसेच बैठकीच्या दोन वर्षांनंतरसुद्धा संबंधित कर्मचाऱ्यांनी जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयास सादर केले नाही. जिल्हा परिषद कार्यालयाने साक्षीच्या बैठकीच्या पूर्वी म्हणजेच माहे एप्रिल व जून, २०१७ मध्ये कर्मचाऱ्यांना नोटिसा देण्यात आलेल्या आहेत. सबब, समितीने या कर्मचाऱ्यांना सेवा समाप्तीची नोटीस देण्यास विलंब लावणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध लवकरात लवकर कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

समितीच्या जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर येथे झालेल्या बैठकीच्या वेळी जिल्हा परिषद कार्यालयातील विभागनिहाय नागपूर जात पडताळणी समितीकडे ११९ प्रकरणे प्रलंबित होती. सद्य:स्थितीत नागपूर पडताळणी समितीकडे ३८ प्रकरणे प्रलंबित आहेत. पडताळणी समितीकडून निकाली काढण्यात आलेल्या ४८ प्रकरणांपैकी ३४ प्रकरणे अवैध ठरविण्यात आली. अवैध झालेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रकरणी जिल्हा परिषद कार्यालयाने कोणती कारवाई केलेली आहे त्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा तसेच पडताळणी समितीकडे प्रलंबित असलेल्या ३८ प्रकरणी पडताळणी समितीने निर्णय घेण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

वरीलप्रमाणे समितीने केलेल्या शिफारशींवर तीन महिन्यांच्या आत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

(४) जिल्हा परिषद, नागपूर या कार्यालयातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त असलेली पदेः-

जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर येथे झालेल्या बैठकीच्या वेळी कार्यालयाअंतर्गत विभागनिहाय कार्यरत असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील सरळसेवेने व पदोन्नतीने भरावयाची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याचे निदर्शनास आले.

दिनांक ५ जुलै २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने बैठकीच्या कालावधीला दोन वर्षे झाले असता अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या अनुशेष भरण्यात आला नाही. समितीला सरळसेवा व पदोन्नतीने सामान्य प्रशासन विभाग -९ पदे, आरोग्य विभाग-८ पदे, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग-१ पद, कृषी विभाग-२ पदे, महिला व बाल कल्याण-२ पदे, वित्त विभाग-४ पदे, पशुसंवर्धन विभाग-५ पदे, शिक्षण विभाग-३१ पदे, बांधकाम विभाग-३ पदे, रिक्त आहेत अशी लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने जिल्हा परिषद कार्यालयातील संवर्गनिहाय अनुशेषाची पदे भरण्यात आलेली नाहीत. संवर्ग निहाय किती पदे शिल्लक आहेत अशी विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समितीने भेट दिली होती. त्यावेळी एकूण पदोन्नतीचा अनुशेष ३४ होता त्यांपैकी सद्यःस्थितीत १० पदे भरली आहेत आणि शिल्लक अनुशेष २४ आहे. सहाय्यक प्रशासन अधिकाऱ्यांचा २ पदाचा अनुशेष आहे. ३ वर्षे सेवा न झाल्यामुळे ती पदे रिक्त आहेत. सन २०१८ मध्ये कर्मचारी पात्र ठरणार आहेत त्यावेळी अनुशेष भरण्यात येईल. वित्त विभागामध्येसुद्धा पदे रिक्त आहेत. त्यांची ३ वर्षांची सेवा व ते परीक्षा उत्तीर्ण न झाल्यामुळे रिक्त आहेत. असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशीः

जिल्हा परिषद कार्यालय येथे झालेल्या बैठकीच्यावेळी विभाग निहाय कार्यरत असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील सरळसेवेने व पदोन्नतीने संवर्ग निहाय अनुशेष भरण्यात आलेला नाही. समितीला दिनांक ५ जुलै २०१७ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीच्या वेळी विभागनिहाय सरळसेवा व पदौन्नतीने एकूण ६५ पदे रिक्त आहेत असे दर्शविण्यात आले त्यामध्ये पदोन्नतीने अनुसूचित जमाती प्रवर्गातील २४ पदांचा अनुशेष आहे. सबब जिल्हा परिषद कार्यालयात विभाग निहाय अनुसूचित जमाती प्रवर्गातील शिल्लक असलेल्या अनुशेषाची पदे तीन महिन्यांच्या आत भरण्यात यावी व रिक्त पदे भरल्याबाबतचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

जिल्हा परिषद, नागपूर येथे झालेल्या बैठकीच्या वेळी समितीने सामान्य प्रशासन विभागातील श्री. बी. आर. सिंग, यांनी अनुसूचित जमातीच्या जागेवर बोगस जात प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी बळकाविली आहे, असे मागासवर्ग कक्षाकडुन प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार निदर्शनास आले आहे. याप्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच श्री. सिंग यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्र नसताना त्यांना दोन वेळा पदोन्नती देऊन पदावनत करण्यात आले याबाबत अधिक खुलासा करावा अशी विचारणा केली, मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी श्री. बी. आर. सिंग यांची नियुक्ती १९९४ मध्ये झालेली आहे. ते ठाकुर जमातीचे आहेत. त्यांना अनुसुचित जमातीच्या जागेवर पदोन्नती दिली होती. त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यानंतर त्यांची पदोन्नती काढून घेण्यात आलेली आहे. त्यांना आता खुल्या प्रवर्गात दर्शविण्यात आले असून त्यांना ज्येष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे. असे समितीला सांगितले. समितीने ती व्यक्ति आदिवासी नाही हे सिद्ध झाले आहे तरीदेखील त्यांना खुल्या प्रवर्गात पदोन्नती देण्यात आलेली आहे. परंतु त्यांनी शासनाची दिशाभुल केलेली आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. त्यांनी शासनाची फसवणूक केलेली असल्यामुळे त्यांना पदोन्नती कशाच्या आधारे देण्यात आलेली आहे अशी पुन्हा विचारणा केली असता, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. यांनी श्री. सिंग यांची नियुक्ती १९९५ पूर्वीची असल्यामुळे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी दिनांक ३० एप्रिल २००४ रोजी सेवेचे संरक्षण दिले आहे.दिनांक १५ जून १९९५ च्या शासन निर्णयानुसार त्यांना ज्येष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गात पदोन्नती देण्यात आली आहे असे समितीला सांगितले.

समितीने अनुपालन अहवालात असे नमुद केले आहे की, उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे पत्र दिनांक २२ फेब्रुवारी २०१३ अन्वये मार्गदर्शन प्राप्त झाले, त्यामध्ये श्री. बी. आर. सिंग यांची अनुसुचित जमाती प्रवर्गातून शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर येथे दिनांक १२ ऑगस्ट १९९४ रोजीची नियुक्ती आहे. परंतु, श्री. सिंग हे अनुसूचित जमाती प्रवर्गाचे अथवा ज्या मागास प्रवर्गाचे आहेत, त्या मागास प्रवर्गाचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करीत नाहीत त्यामुळे त्यांची नियुक्ती दिनांक १५ जून १९९५ पूर्वीची असली तरी त्यांच्या सेवेस संरक्षण प्राप्त होणार नाही. सदर प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ७ जानेवारी २०१२ च्या शुद्धीपत्रकानुसार कार्यवाही करावी. असे नमूद केलेले असल्याने या प्रकरणाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, नागपूर येथे अनेक प्रकारच्या त्रुटी आहेत. याप्रकरणी संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात यावी असे निदेश दिले.

दिनांक ५ जुलै २०१७ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी श्री. बी. आर.सिंग यांची जिल्हा परिषद, नागपूर येथे वरिष्ठ सहाय्यक पदावर अनुसूचित जमातीचे प्रवर्गातुन दिनांक १२ ऑगस्ट १९९४ रोजी नियुक्ती दिली होती. त्यांचे जात प्रमाणपत्र तपासणीसाठी जात पडताळणी समितीकडे पाठविण्यात आले होते. त्यांनी दिनांक ६ ऑक्टोबर २०१५ चे आदेशाने अवैध ठरविले. तथापि, शासनाचे शासन निर्णय, दिनांक ३० जून २००४ नुसार सेवेत संरक्षण प्रदान करून

अनुसूचित जमाती या प्रवर्गाचा बिंदू रिकामा करण्यात आला. दरम्यानचे काळात जात वैधता प्रमाणपत्र नसताना जात वैधता प्रमाणपत्र ६ महिन्यांत उपलब्ध करून देण्याचे अटीवर अधीक्षक पदावर तात्पुरती पदोन्नती देण्यात आली होती. परंतु त्यांनी कागदपत्र सादर केले नसल्याने त्यांना अधीक्षक पदावर स्थगिती देण्यात आली व तद्नंतर खुल्या प्रवर्गातून दिनांक १९ ऑगस्ट २००४ ला अधीक्षक पदावर व दिनांक १८ ऑगस्ट २००८ ला खुल्या प्रवर्गात कक्ष अधिकारी पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे. त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र दिनांक ६ ऑक्टोबर २०१५ चे आदेशान्वये अवैध ठरविण्यात आले. दिनांक १८ मे २०१३ च्या शासन निर्णयानुसार त्यांनी इमाव चे प्रमाणपत्र सादर केले असून त्याच प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे अनुसूचित जमातीचा बिंदू मोकळा झालेला आहे अशी लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने श्री. सिंग यांच्या प्रकरणी अधिक खुलासा करावा अशी विचारणा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी श्री.सिंग यांची नियुक्ती दिनांक १५ जून १९९५ पूर्वीची होती. दिनांक १८ मे २०१३ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीचे दावे सोडून यांनी इतर संवर्गाचे जात प्रमाणपत्र दिले असल्याने त्यांच्या बिंदू सन २०१३ मध्ये रिक्त केलेला आहे. दिनांक १९ ऑगस्ट २००४ आणि, दिनांक १८ ऑगस्ट २००८ रोजी त्यांना खुल्या संवर्गातून पदोन्नती देण्यात आली होती. जेव्हा त्यांना पदोन्नती देण्यात आली तेव्हा त्यांना अनुसूचित जमातीचा फायदा मिळाला नाही. त्यांना ज्या दिवशी पदोन्नती मिळाली त्यानंतर ते खुल्या संवर्गात गेले असावे. असे समितीला सांगितले.

समितीने, श्री.सिंग सन १९९४ मध्ये लागले त्यामुळे सन १९९५ नंतर ते संरक्षित झाले. त्यानंतर बिंदू रिक्त करणे आवश्यक होते. त्यांना सन २००४ आणि सन २००८ मध्ये पदोन्नती दिली. पदोन्नती देत असताना प्रथम सन २००४ साली बिंदू रिक्त करणे आवश्यक होते. परंतु आपण सन २०१३ मध्ये बिंदू रिक्त केला आहे. श्री.सिंग यांची कागदपत्रे आपल्याकडे नसताना कार्यालयाने कशाच्या आधारे त्यांना पदोन्नती व त्यांची कोर्टात केस सुरू असताना त्यांना खुल्या संवर्गातून कशी पदोन्नती दिली आहे अशी समितीने विचारणा केली.

प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी श्री. सिंग यांना सन २००४ ला पदोन्नती दिली होती त्यावेळी त्यांची जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरले नव्हते. त्यांना त्यानंतर सन २००८ मध्ये पदोन्नती देण्यात आली त्यावेळी त्यांची जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरले होते. त्यांना संवर्गातील पदोन्नतीसाठी ते पात्र असतील म्हणून पदोन्नती दिली असेल. किंवा त्यांच्या जात वैधतेबद्दल अंतिम निर्णय झाला नसेल तर, मेरिटनुसार ते खुल्या संवर्गात पदोन्नतीसाठी पात्र असतील तर त्यांना पदोन्नती देता येते असे समितीच्या निदर्शनास आणून दिले. समितीने जात वैधता प्रमाणपत्र वैध-अवैध होणे हा नंतरचा भाग आहे, परंतु त्यावेळेस अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त झाला असता तर आज हा विषय उपस्थित झाला नसता. जे अनुसूचित

जमातीच्या संवर्गात आहेत, परंतु त्यांना खुला संवर्गात पदोन्नती दिली अशी किती प्रकरणे आहेत? अशी पुन्हा विचारणा केली असता सचिव, (सा. प्र. वि.) यांनी ज्येष्ठता यादीप्रमाणे अनुसूचित जाती-जमातीच्या संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात येते परंतु सन २००४ मध्ये पदोन्नती दिली असेल तर त्यावेळी अनुसूचित जमातीच्या बिंदू रिक्त होणे आवश्यक होते. श्री. सिंग यांची प्रथम अनुसूचित जमातीच्या संवर्गामध्ये निवड झाली होती. त्यानंतर त्यांना खुल्या संवर्गात रिक्त होणाऱ्या पदावर पदोन्नती दिली. असे समितीच्या निर्दशनास आणून दिले. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी सन १९९५ पूर्वीचे त्यांना संरक्षण मिळाले आहे. सन १९९५ नंतर त्यांना अनुसूचित जमाती या संवर्गाचा कोणताही फायदा मिळालेला नाही. ज्येष्ठतेप्रमाणे ते पदोन्नतीच्या निकषात बसत असतील म्हणून त्यांना खुल्या संवर्गात पदोन्नती दिलेली आहे. त्यांना पदोन्नती दिल्यानंतर तो बिंदु रिक्त व्हायला पाहिजे होता. दरम्यान सहा महिन्यांच्या कालावधीत त्यांना अधिक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे असे समितीला सांगितले.

समितीने श्री. सिंग यांची नियुक्ती सन १९९५ पूर्वीची असल्यामुळे त्यांना संरक्षित करणे आवश्यक आहे. त्यांना खुल्या संवर्गातुन पदोन्नती देण्यात आली असल्यामुळे तो बिंदु सन २००४ मध्ये रिक्त होणे आवश्यक होते. परंतु असे न होता सन २०१३ मध्ये बिंदु रिक्त झाला, ते कर्मचारी आता अनुसूचित जमातीच्या संवर्गातील दावा सोडत आहेत. सप्टेंबर, २०१३ मध्ये त्यांनी दुसरे जात प्रमाणपत्र सादर केले सन २०१३ मध्ये बिंदू रिक्त झाला आहे. यास जबाबदार कोण, त्याप्रकरणी चौकशी करून समितीला तत्काळ अहवाल पाठविण्यात यावा असे निदेश दिले.

तसेच समितीने ज्या व्यक्तीने याबाबतची नोटिंग केली आहे ती व्यक्ती या प्रकाराला जबाबदार आहे. शासन निर्णयान्वये बिंदु रिक्त करणे किंवा पदोन्नती देणे हे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र असेल तरच करणे गरजेचे होते. ते न करता अटी व शर्ती नमुद करून पुढील पदोन्नती देण्यात आली आहे व त्यामुळेच असा प्रकार घडला आहे असे समितीने मत व्यक्त केले असता प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी यासंपूर्ण घडलेल्या प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाकडून चौकशी करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशीः

जिल्हा परिषद कार्यालयाच्या सामान्य प्रशासन विभागात कार्यरत असलेले श्री. बी. आर. सिंग यांची अनुसूचित जमातीच्या बिंदूवर बनावट जात प्रमाणपत्राच्या आधारे सन १९९४ मध्ये वरिष्ठ सहाय्यक पदावर नियुक्ती झालेली आहे. त्यांना सेवेत संरक्षण असले तरी, त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र नसताना त्यांना अनुसूचित जमातीच्या बिंदूवर ऑगस्ट २००४ मध्ये प्रथम पदोन्नती देण्यात आली आहे. पडताळणी समितीने त्याचे जात प्रमाणपत्र ऑक्टोबर २०१५ मध्ये अवैध ठरविले असता त्यांची पदोन्नती काढून घेण्यात आली व त्यांना खुल्या प्रवर्गात दर्शवून ज्येष्ठतेनुसार

ऑगस्ट २००४ मध्ये प्रथम पदोन्नती देण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा ऑगस्ट २००८ मध्ये दुसऱ्यांदा पदोन्नती देण्यात आली आहे. याप्रकरणी शासनाची दिशाभूल करण्यात आली आहे असे समितीचे मत आहे. श्री. सिंग यांनी सन २०१३ मध्ये इतर मागासवर्गाचे प्रमाणपत्र सादर केले त्यानंतर अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करण्यात आला.

समितीच्या मते, जात वैधता प्रमाणपत्र वैध-अवैध होणे हा नंतरचा भाग आहे परंतु सन २००४ मध्ये प्रथम पदोन्नती देण्याच्या पूर्वी शासन निर्णयान्वये अन्य मागास प्रवर्गातील प्रमाणपत्र सादर करून अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करणे आवश्यक होते परंतु त्यावेळी अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त झाला नाही. सबब, समिती शिफारस करते की, याप्रकरणी चौकशी करून जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या विरूद्ध कारवाई करण्यात यावी तसेच श्री. सिंग यांनी कार्यालयाची वारंवार दिशाभूल केलेली असल्याने या प्रकरणी चौकशी करून त्यांच्या विरुद्ध कारवाई करण्यात यावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

तसेच श्री. सिंग यांची अनुसूचित जमाती प्रवर्गातून प्रथम सेवेत नियुक्ती झाली असल्याने अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करण्यात आला नाही. सन २०१३ मध्ये बिंदू रिक्त केलेला असून त्या कालावधी पर्यंत त्यांना सन २००४, व सन २००८ या कालावधीत दिनांक ३० जून २००४ च्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त न करता खुल्या प्रवर्गातून दोनदा पदोन्नती देण्यात आली आहे. सबब श्री. सिंग यांना पदोन्नतीच्या कालावधीत प्राप्त झालेल्या अधिक आर्थिक लाभाची वसुली करण्याबाबतची कारवाई करण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

श्री. सिंग यांच्या प्रकरणी ज्या व्यक्तीने नोटिंग केली आहे ती व्यक्ती या प्रकरणाला जबाबदार आहे. शासन निर्णयान्वये बिंदु रिक्त करणे किंवा पदोन्नती देणे हे अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र असेल तरच करणे गरजेचे होते. ते न करता अटी व शर्ती नमुद करून पुढील पदोन्नती देण्यात आली आहे व त्यामुळेच असा प्रकार घडला आहे. असे समितीने मत व्यक्त केले यासंपूर्ण घडलेला प्रकरणाची सामान्य प्रशासन विभागाकडून चौकशी करण्यात यावी व केलेल्या चौकशी अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

श्री. आर. जी. पालांदुरकर यांची प्रथम नियुक्ती दिनांक १ सप्टेंबर १९८६ राजी अनुसूचित जमाती या प्रवर्गात झालेली आहे. श्री. आर. जी. पालांदुरकर यांना ग्रामविकास अधिकारी या पदावर खुल्या प्रवर्गातुन या कार्यालयाचे आदेश क्र. जिपना/पंचायत/स्था-१/१५९०/२००७ दिनांक ३१ ऑगस्ट २००७ अन्वये पदोन्नती देण्यात आलेली होती.

श्री. आर. जी. पालांदुरकर यांनी इतर मागासवर्गीय प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र क्र. २४८०७९ दिनांक ५ ऑगस्ट २०१३ सादर कलेले आहे. सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक बी.सी.सी.२००२/प्र.क्र.-९३/०४/१६४ दिनांक ३० जुन, २००४ मधील तरतुदीनुसार त्यांची प्रथम नियुक्ती १५ जून १९९५ पूर्वीची असल्याने त्यांना सेवेत संरक्षण प्रदान करण्यात येऊन त्यांची ग्रामसेवक पदावर १५ जून १९९५ ही सेवाजेष्ठता निश्चित करून त्यांची पदोन्नती १५ जून १९९५ नंतरची असल्याने या कार्यालयाचे आदेश क्र.जिपना/पंचायत/स्थ-१/३८२९/२०१५ दिनांक १९ सप्टेंबर, २०१५ ला पदावनत करण्यात आलेले आहे. त्यांची प्रथम नियुक्ती अनुसूचित जमाती प्रवर्गातून झालेली असुन हा देखील विषय उपरोक्त प्रकरणासारखाच आहे. सदर दोन्ही प्रकरणांमध्ये सामान्य प्रशासन विभागाचे मार्गदर्शन घेऊन पुढील कारवाई करण्यात यावी असे निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

श्री. आर. जी. पालांदूरकर यांची नियुक्ती सन १९८६ मध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातून झालेली असल्याने त्यांना सेवेत संरक्षण आहे. श्री. पालांदूरकर यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न करता त्यांना खुल्या प्रवर्गातून ऑगस्ट २००७ मध्ये पदोन्नती देण्यात आली आहे. श्री. पालांदुरकर यांनी इतर मागासप्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र ऑगस्ट, २०१३ मध्ये सादर केलेले असल्याने व त्यांची पदोन्नती सन १९९५ नंतर झालेली असल्याने त्यांना पदावनत करण्यात आले. सन २००७ मध्ये प्रथम पदोन्नती देण्याच्या पूर्वी शासन निर्णयान्वये अन्य मागासप्रवर्गातील प्रमाणपत्र सादर करून अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त करणे आवश्यक होते परंतु त्यावेळी अनुसूचित जमातीचा बिंदू रिक्त झाला नाही. त्याचप्रमाणे जात वैधता प्रमाणपत्र नसताना देखील पदोन्नती देण्यात आली आहे. सबब, समिती शिफारस करते की, या प्रकरणी चौकशी करून केलेल्या याप्रकरणी जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या विरूद्ध कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.

जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला :

(५) जिल्हाधिकारी कार्यालयात अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त असलेली पदे :-

अनुसूचित जमाती कल्याण समितीची दिनांक २८ ते ३० जानेवारी, २०१६ या कालावधीत अकोला येथे बैठक झाली. समितीने दिनांक २९ जानेवारी २०१६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातंर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातील रिक्त असलेल्या पदांबाबत आढावा घेतला असता समितीला पुरविण्यात आलेल्या माहितीनुसार समितीने जिल्हाधिकारी कार्यालयात अनुसूचित जमाती प्रवर्गातील पदोन्नतीने अव्वल कारकून १ पद, मंडळ अधिकारी १ पद, कनिष्ठ लिपिक ३ पदे केव्हापासून रिक्त आहेत? रिक्त पदे केव्हा पर्यंत भरण्यात येणार आहे व पदे भरणेबाबत कोणती कार्यवाही केली आहे अशी विचारणा केली. जिल्हाधिकारी यांनी अव्वल कारकून या संवर्गातील १०० टक्के पदे पदोन्नतीने भरली जात असल्यामुळे

कनिष्ठ लिपिक संवर्गातून अव्वल कारकून या पदासाठी पात्र कर्मचारी उपलब्ध नसल्याने हे पद रिक्त आहे. मंडळ अधिकारी या संवर्गातील पदे देखील १०० टक्के पदोन्नतीने भरली जातात. या संवर्गातील पदोन्नतीच्या एका पदाबाबत न्यायालयीन प्रक्रिया सुरू असल्यामुळे ते पद रिक्त आहे. भरती प्रक्रियेबाबत दिनांक ११ डिसेंबर २०१४ रोजी निकाल लागलेला आहे. पुढील कार्यवाही करण्यात येत आहे, असे समितीला सांगितले. समितीने रिक्त असलेली पदे भरल्यानंतर त्यांचा अहवाल सामितीला पाठविण्यात यावा, असे निदेश दिले.

दिनांक ५ जुलै २०१७ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्यावेळी समितीला जिल्हाधिकारी कार्यालयातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील कनिष्ठ लिपीक संवर्गातील सद्यःस्थितीत २ पदे रिक्त असून सदर रिक्त पदे हे शिपाई संवर्गातून कनिष्ठ लिपिक संवर्गात पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर पदाकरिता सप्टेंबर २०१८ पर्यंत पात्र कर्मचारी उपलब्ध होणार असून कर्मचाऱ्याची पात्रता (शिपाई संवर्गात ३ वर्ष पूर्ण होणे) होताच सदर कर्मचाऱ्यांना कनिष्ठ लिपिक संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येईल अशी लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

उपरोक्त माहितीच्या अनुषंगाने समितीने अनुसूचित जमाती प्रवर्गातून भरण्यात आलेल्या अव्वल कारकून आणि मंडळ अधिकारी या पदावरील कर्मचाऱ्यांकडून पदोन्नतीपूर्वी जात वैधता प्रमाणपत्र घेण्यात आले आहे काय? अशी विचारणा केली असता जिल्हाधिकारी, अकोला यांनी अव्वल कारकून आणि मंडळ अधिकारी यांची पदे भरण्यात आलेली आहेत. जात वैधता प्रमाणपत्र समितीला सादर करण्यात येईल. तसेच शिपाई या संवर्गातील तीन पदे रिक्त होती त्यांपैकी, दोन पदे भरण्यात आलेली आहेत. तीन पैकी दोन पात्र उमेदवार मिळालेले आहेत. त्यासाठी आवश्यक असणारी पात्रता ही तीन वर्षे सेवा पूर्ण झाल्याचा अनुभव पाहिजे. पदोन्नती देऊन त्यांना सहा महिने झालेले आहेत. पदोन्नती देण्यात आलेले कर्मचारी पूर्वीपासून सेवेमध्ये होते. पदोन्नती दिलेले कर्मचारी ह्यांना तीन वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्यामुळे निश्चितच त्यांची जात वैधता प्रमाणपत्र तपासणी झालेली आहे, याची माहिती समितीला आठ दिवसांत पाठविण्यात येईल, असे समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

अकोला जिल्हाधिकारी कार्यालयातील अनुसूचित जमाती प्रवर्गातून कनिष्ठ लिपिक संवर्गात पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त असलेल्या २ पदांसाठी शिपाई संवर्गातील ३ वर्षे सेवा पूर्ण झालेला पात्र कर्मचारी सप्टेंबर २०१८ पर्यंत प्राप्त होणार आहे. पात्र कर्मचारी उपलब्ध झाल्यानंतर कनिष्ठ लिपिक संवर्गातील पदोन्नतीची पदे भरण्यात यावी व पदे भरल्याबाबतचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात पदोन्नतीने भरण्यात आलेला अव्वल कारकून व मंडळ अधिकारी पदावरील कर्मचाऱ्यांची व सरळसेवेने भरण्यात आलेल्या शिपाई संवर्गातील २ कर्मचाऱ्याची जात वैधता प्रमाणपत्राची प्रत समितीला सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.

जिल्हा परिषद अकोला

(६) जिल्हा परिषद कार्यालयातील रिक्त असलेली पदेः-

समितीची दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी जिल्हा परिषद कार्यालयात बैठक घेण्यात आली. जिल्हा परिषद कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने वर्ग-३ व वर्ग-४ मधील अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांची भरती, बढती व आरक्षण व अनुशेष संदर्भात आढावा घेतला. जिल्हा परिषद कार्यालयात रिक्त असलेल्या पदांमध्ये समितीने जिल्हा परिषद कार्यालयातील कार्यरत असलेल्या विभागांतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातील सरळसेवेने व पदोन्नतीने भरावयाची पदे केव्हापासून रिक्त आहे व पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हा परिषदेमध्ये वर्ग-३ व वर्ग-४ मधील सरळसेवेतील एकूण पदांची संख्या ६ हजार २२२ आहे. त्यांपैकी सरळसेवेने भरलेल्या पदांची संख्या ५ हजार ४५७ आहे. त्यामध्ये ४ टक्के आरक्षणानुसार पदांची संख्या ३८७ आहे. अनुसूचित जमातीची एकूण सरळसेवेची व पदोन्नतीची ४४२ पदे आहेत. त्यांपैकी ४३२ पदे भरण्यात आलेली आहेत. केवळ १० पदे रिक्त आहेत. तसेच सामान्य प्रशासन विभागामध्ये अनुसूचित जमातीच्या राखीव पदांपैकी सरळ सेवेची रिक्त पदांची संख्या ३ आहे. पदोन्नतीने भरावयाच्या रिक्त पदांची संख्या ६ आहे. अशी ९ पदे रिक्त आहेत. यासंदर्भातील सरळसेवा भरती नोव्हेंबर मध्ये करण्यात आली होती. उर्वरित पदे अनुकंपा तत्त्वावर भरण्यात येणार असून पदे भरण्याची कार्यवाही सुरू केलेली आहे. सदरहू पदे डिसेंबर, २०१५ पर्यंत भरावयाची होती. आता लवकरात लवकर पद भरती प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.

पंचायत विभागात पदोन्नतीचे एक पद रिक्त आहे. बिंदु नामावली मंजूर झाली की, सदरहू पद तातडीने भरण्यात येईल. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी या संदर्भातील अहवाल सादर करावा असे समितीने निदेश दिले.

कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांनी पदोन्नतीकरीता उमेदवार उपलब्ध नसल्यामुळे सदरहू पद सरळ सेवेने भरण्यात यावे, याकरिता परवानगी मागण्यात आलेली आहे. त्यासंदर्भातील प्रस्ताव आयुक्त कार्यालयाकडून शासनास सादर करण्यात आलेला आहे. बांधकाम विभागाची बिंदु नामावली याच वर्षी मंजूर करून घेतलेली आहे. तारतांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी इत्यादी तीन पदे भरण्यात आलेली आहेत. पदोन्नतीच्या पदासंदर्भात कार्यवाही करण्यात येणार आहे. लघु सिंचन विभागातील सरळसेवेचे व पदोन्नतीचे प्रत्येकी एक पद रिक्त आहे. शिक्षण विभागात अनुसूचित जमातीसाठी सरळसेवेने एकूण २६७ पदे राखीव असताना प्रत्यक्षात २८८ पदे भरण्यात आली आहेत. जादा पदे भरण्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा केली असता मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी सन, २००१ पासून २००९ पर्यंत उर्दू शिक्षकांमध्ये अनुसूचित जमातीची पदे भरण्यात आली. त्यावेळी जात वैधता प्रमाणपत्र नसताना ६४ उर्दू शिक्षक अनुसूचित जमाती संवर्गात नेमण्यात आले. यासंदर्भात शासनाकडे तक्रारी

करण्यात आल्या होत्या. त्यानुसार माननीय विभागीय आयुक्त यांच्या सूचनेनुसार तीन महिन्यांमध्ये उपायुक्त यांच्या पथकाकडून ६४ उर्दू शिक्षकांची भरती अनुसूचित जमाती प्रवर्गात कशा प्रकारे करण्यात आली, याची चौकशी करण्यात आली. उर्दू शिक्षकांना अनुसूचित जमाती प्रवर्गात आरक्षण नसताना ६४ पदे भरण्यात आल्यामुळे जिल्हा परिषदेने या शिक्षकांना सेवेतून कमी केले होते. त्यानंतर सदरहू शिक्षक उच्च न्यायालयात गेले व उच्च न्यायालयाने त्यांच्या सेवेला तूर्त संरक्षण दिल्याने ते सेवेमध्ये आहेत, असे समितीला सांगितले. समितीने याप्रकरणी चौकशी करून समितीला अहवाल सादर करण्यात यावा असे निदेश दिले.

दिनांक ५ जुलै २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीला सामान्य प्रशासन विभागातील कक्ष अधिकारी व वाहन चालक या पदोन्नती संवर्गात अनुसूचित जमाती या प्रवर्गाची ६ पदे सन २००७ पासून रिक्त असून सदर रिक्त पदांचा अनुशेष पूर्ण करण्याकरिता परिचर वर्ग-४ या संवर्गात वाहन परवानाधारक कर्मचारी उपलब्ध होत नसल्याने अनुशेषाची पूर्तता करता आली नाही. दिनांक २९ नोव्हेंबर २०१६ अन्वये सामान्य प्रशासन विभागाधिनस्त येणाऱ्या संवर्गाच्या १००% बिंदुनामावल्या मंजुरी बाबतचे प्रस्ताव सहा. आयुक्त (मा.व.क) अमरावती यांना सादर केले आहेत. मंजुरी प्राप्त होताच पदोन्नती प्रक्रियाद्वारे अनुशेषाची पदे भरण्यात येतील. तसेच वित्त विभागाधिनस्त येणाऱ्या संवर्गाच्या मंजुरीबाबतचे प्रस्ताव प्राप्त होताच पदोन्नती प्रक्रियाद्वारे अनुशेषाची पदे भरण्यात येतील. सरळसेवेची पदे एक वर्षापासून रिक्त असून सदर रिक्त पदे सरळसेवा भरती सन २०१६ मध्ये भरणे अपेक्षित होते. बिंदुनामावली मंजूर होताच अनुशेष भरण्यात येईल.

ग्रामविकास अधिकारी या संवर्गाचे एकूण ६९ पदे मंजूर होती. मंजूर पदामध्ये अनुसूचित जमाती या संवर्गाची ५ पदे राखीव होती. राखीव पदापैकी ४ पदे भरलेली व १ पद रिक्त होते. पंचायत विभागाची बिंदु नामावली मंजूर होताच रिक्त पद भरण्यात येणार आहे. बांधकाम विभागाचे अधिनस्त असलेल्या विविध संवर्गातील सेवाप्रवेश नियमातील सुधारणा शासनाकडून अप्राप्त असल्यामुळे शासनाकडून अहवाल प्राप्त होताच अनुसूचित जमातीचे पद भरणे बाबतची कार्यवाही करता यंईल. लघुसिंचन विभागातील कनिष्ठ अभियंता या प्रवर्गातील सरळसेवा व पदोन्नतीचे प्रत्येकी एक पद रिक्त असून सदर संवर्गाची बिंदुनामावली मंजूर करून घेणेबाबतची कार्यवाही सुरू आहे.

उपरोक्त प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने वाहन चालक संवर्गात पदोन्नतीने भरावयाची अनुसूचित जमाती प्रवर्गात पाच पदे असून सन २००७ पासून परवानाधारक कर्मचारी नसल्यामुळे सदर पदे किती वर्षापर्यंत रिक्त ठेवता येते, पद भरण्याबाबत विभागाने काय कार्यवाही केलेली आहे? अशी विचारणा केली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी यामध्ये गट-ड चे परिचर पदाचे कर्मचारी आहेत त्या संवर्गातून २५ टक्के पदे भरण्यात येत असतात. परिचर संवर्गातील अनुसूचित जमाती प्रवर्गातील परवानाधारक वाहनचालक नसल्यामुळे सदर पदे भरता आलेली नाहीत. त्यामुळे

आता याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठवून पदोन्नतीची पदे सरळसेवेमधून भरण्याची परवानगी घ्यावी लागेल. असे समितीला सांगितले.

समितीने वाहन चालक प्रशिक्षणाची प्रकल्प कार्यालयाची एक योजना आहे. त्या कार्यालयाकडे त्यांना का पाठविण्यात आले नाही. अशी विचारणा केली असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अनुसूचित जमाती च्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना विचारून त्याना पेमेंट ऑफिसकडे प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येईल. तसेच प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी वाहन चालकाचे पद रिक्त असेल आणि पदोन्नतीने सदर उमेदवार मिळत नसतील तर विभागीय आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत की, ते सदर पदे हे सरळ सेवेमधून भरू शकतात. त्यामुळे सदर अनुसूचित जमाती प्रवर्गातून सरळसेवेने पद भरणे शक्य आहे असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

समितीने शिक्षण विभागातील शिक्षकांचे जात वैधता प्रमाणपत्र अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाहीत, त्यांच्यावर काय कार्यवाही करण्यात आलेली आहे, अशी विचारणा केली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिक्षण विभागातील बिंदुनामावली संदर्भात जो प्रश्न आहे त्याबाबत एकूण १४७ विविध प्रवर्गातील शिक्षक आहेत. त्यामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील ११ शिक्षक आहेत. चार शिक्षकांची नियुक्ती ही सन १९९५ पूर्वीची असल्यामुळे त्यांना संरक्षण आहे. चार शिक्षकांनी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीसाठी सादर केलेले आहे. असे समितीच्या निदर्शनास आणून दिले. समितीने चार शिक्षकांनी केव्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीसाठी सादर केलेले आहे, त्यांचा दिनांक काय आहे अशी विचारणा केली असता, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक १२ फेब्रुवारी, २०१३, दिनांक १० सप्टेंबर, २०१३ मधील तीन शिक्षक आहेत. उर्वरित चार शिक्षकांनी समितीकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच यामध्ये एक न्यायालयीन प्रकरण आहे, असे समितीला सांगितले.

समितीने प्राथमिक शिक्षकांची बिंदूनामावली अद्ययावत स्वरूपात तयार करण्यात आलेली आहे काय. सन १९९५ पूर्वी च्या चार शिक्षकांना पदोन्नती देण्यात आलेली आहे काय. अशी विचारणा केली. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी प्राथमिक शिक्षकांची बिंदूनामावली अद्ययावत स्वरूपात तयार झालेला नाही. राखीव प्रवर्गातील एकूण १४७ शिक्षक असे आहेत की, त्यांनी अद्यापपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत. त्या सर्व शिक्षकांना बडतर्फ करण्याबाबतच्या सूचना दिनांक २९ एप्रिल २०१७ रोजी जारी करण्यात आलेल्या आहेत. काही शिक्षकांनी सदर नोटीसवर उच्च न्यायालयात स्थगिती मिळण्यासंदर्भात प्रकरण दाखल केलेले आहे. ज्यांची प्रकरणे न्यायालयात दाखल करण्यात आलेली आहेत, त्यांच्या शिवाय इतर शिक्षकांचे बडतर्फी आदेश पुढील पंधरा दिवसांमध्ये काढण्यात येतील. सदर चार शिक्षक हे अद्यापपर्यंत सहायक शिक्षक याच पदावर कार्यरत आहेत. जर सदर शिक्षक हे ग्रॅज्युएट असतील तरच त्यांना शिक्षकांचा दर्जा देण्यात येतो. सन १९९५ पर्यंती ग्रॅज्युएशनची यादी अद्यापर्यंत आलेली नसल्यामुळे त्यापूर्वीच्या शिक्षकांना सध्या पदोन्नती देण्यात येत आहे असे समितीला सांगितले.

प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी ज्या शिक्षकांची नियुक्ती ही सन १९९५ पूर्वीच्या आहेत त्यांच्या नियुक्त्या ह्या कोणत्या बिंदूवर झालेल्या आहेत त्याबाबतची कागदपत्रे सापडत नाहीत, हा त्यातील फार मोठा प्रश्न आहे. त्यामुळे जरी एखादा शिक्षक हा अनुसूचित जमाती प्रवर्गातील असेल आणि त्याची नियुक्ती ही खुल्या प्रवर्गातून झालेली असेल तर त्याला कोणत्या बिंदूवर घ्यावे ह्या बाबत अडचण निर्माण झालेली आहे. असे प्रकार हे केवळ अनुसूचित जमाती प्रवर्गापूरते नसून ते सर्व राखीव प्रवर्गातील शिक्षकांच्याबाबत आहेत. याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे यांना पाठविलेला आहे. सदर प्रस्तावावर सामान्य प्रशासन विभागाने अभिप्राय दिलेले आहेत की, जो पर्यंत असे कागदपत्रे सापडत नाहीत तो पर्यंत ज्या प्रवर्गातून शिक्षकांची नियुक्ती झालेली आहे त्यांना त्या प्रवर्गात दाखविण्यात यावे आणि जेव्हा असे कागदपत्रे सापडतील तेव्हा यामध्ये सुधारणा करण्यात येईल. यामध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातील कर्मचारी खुल्याप्रवर्गातून मोडत असेल तर त्यांच्यावर निश्चितपणे अन्याय होत आहे. त्यामुळे यामध्ये जर एखाद्या शिक्षकाला जिल्हा बदली हवी असेल तर कोणत्या बिंदूवर दाखवावयाचे ह्या प्रकारच्या अडचणी उद्‌भवतात, असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

अभिप्राय व शिफारशी :

अकोला जिल्हापरिषद कार्यालयांतर्गत विभागनिहाय रिक्त असलेली पदे बिंदू नामावली नोंदवही मंजूर नसल्याने रिक्त आहेत. उक्त रिक्त पदांपैकी सामान्य प्रशासन विभागातील पदोन्नतीने भरावयाचे कक्ष अधिकारी संवर्गातील एक पद, वर्ग-४ मध्ये वाहन परवाना धारक कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे वाहन चालक संवर्गातील पदोन्नतीने भरावयाची ६ पदे, वित्त विभागातील रिक्त सरळसेवेने भरावयाची पदे, पंचायत विभागातील पदोन्नतीने भरावयाचे ग्रामविकास अधिकारी एक पद, बांधकाम विभागातील रिक्त असलेले एक पद, लघुसिंचन विभागातील कनिष्ठ अभियंता या प्रवर्गातील सरळसेवा व पदोन्नतीने भरावयाचे प्रत्येकी एक पद रिक्त आहे. सबब, जिल्हा परिषद कार्यालयातील विभागनिहाय बिंदू नामावली नोंदवहीची तपासणी विभागीय आयुक्त कार्यालय, मागासवर्ग कक्षाकडून करण्यात आली नाही त्यामुळे अनुसूचित जमाती प्रवर्गातील पदे रिक्त दिसून येतात. बिंदू नामावली नोंदवही तपासणीकरिता सादर न करणाऱ्या विभागनिहाय संबंधित अधिकारी /कर्मचारी यांच्या विरुद्ध चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी. तसेच विभागनिहाय रिक्त असलेली पदे तीन महिन्यांच्या आत भरण्यात यावी व रिक्त पदे भरण्यात आल्याबाबतचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

तसेच पदोन्नतीने भरावयाच्या वाहन चालक संवर्गात परवानाधारक चालक उपलब्ध होत नसेल तर सरळसेवेने पदे भरणेबाबत विभागीय आयुक्त स्तरावरून मंजूरी प्राप्त करून रिक्त पदे भरण्यात यावी अशी ही समिती शिफारस करीत आहे.

(७) शिक्षण विभागातंर्गत उर्दू शिक्षकाची झालेली भरती.

सन २००१ ते २००९ पर्यंत या कालावधीत शिक्षण विभागातंर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातील ६४ उर्दू शिक्षक भरण्यात आले आहेत. यासंदर्भात शासनाकडे तक्रारी करण्यात आल्या असता, माननीय विभागीय आयुक्त यांच्या सूचनेनुसार तीन महिन्यांमध्ये उपायुक्त यांच्या पथकाकडून ६४ उर्दू शिक्षकांची भरती अनुसूचित जमाती प्रवर्गात कशा प्रकारे करण्यात आली याची चौकशी करण्यात आली. उर्दू शिक्षकांना अनुसूचित जमाती मध्ये आरक्षण नसताना ६४ पदे भरण्यात आल्यामूळे जिल्हा परिषदेने या शिक्षकांना सेवेतून कमी केले होते. त्या विरोधात संबंधित शिक्षकांनी न्यायालयात याचिका दाखल केलेली आहे. त्या अनुषंगाने माननीय उच्च न्यायालयाने दिनांक १४ मार्च २०१३ रोजी दिलेल्या आदेशानुसार संबंधित शिक्षकास सेवेत पुनर्स्थापित करण्यात आलेले आहे.

समितीने, शिक्षण विभागातंर्गत शिक्षकांची २६७ पदे सरळसेवा भरतीने भरण्यात आली. त्यामध्ये ६४ पदे उर्दू शिक्षकांची भरली. त्यामध्ये दोषारोप करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांवर काय कारवाई केली आहे ह्या कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत काय तसेच १७-१८ व्यक्ती कोर्टात गेल्या नाहीत त्यांच्यावर काय कारवाई केलेली आहे अशी विचारणा केली असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी आधिकारी, जिल्हा परिषद यांनी सन २०१० मध्ये त्यांच्या विरोधात एफआयआर दाखल केलेला आहे. जिल्हा न्यायालयात त्यांच्या विरोधात प्रकरण सूरू आहे. त्यानंतर ज्या शिक्षकांना बडतर्फ केलेले होते ते उच्च न्यायालयात गेले आणि उच्च न्यायालयाने या प्रकरणी विभागीय आयुक्तांनी यावर निर्णय द्यावेत असे सांगितले. विभागीय आयुक्तांनी असा निर्णय दिला की, हे प्रकरण फौजदारी गुन्हा असल्यामुळे जिल्हा न्यायालयात प्रलंबित आहे. जो पर्यंत फौजदारी गुन्ह्याचा निकाल लागत नाही तो पर्यंत यांना सेवेमध्ये ठेवण्यात यावे. त्यामुळे सदर कर्मचारी सेवेमध्ये कायम आहेत असे समितीला सांगितले.

यावर समितीने, या कर्मचाऱ्यांना कायम ठेवण्यात यावे असा निर्णय विभागीय आयुक्तांनी दिलेला आहे काय? या संदर्भात कार्यालयामार्फत न्यायालयात अपील केले गेले आहे किंवा नाही अशी विचारणा केली असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी जिल्हा न्यायालयात या ६४ शिक्षकांविरुद्ध जी फौजदारी गुन्हा सुरू आहे. त्यांचा निकाल लागेपर्यंत यांना सेवेत कायम ठेवण्यात यावे. त्यांनी अनुसूचित जमातीचे खोटे प्रमाणपत्र सादर केले आहेत असे जर सिद्ध झाले तर त्यांना बडतर्फ करण्यात येईल. या प्रकरणी लवकरात लवकर पाठपुरावा करून कारवाई करण्यात येईल, असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

एखाद्या आदिवासी कर्मचाऱ्यावर अन्याय केला तर तो गुन्हा आहे. त्या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे, अशी विचारणा केली असता, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी बिंदू रिक्त झाले तर या ६४ लोकांची संधी जात आहे असे होणार नाही यांची दक्षता घेण्यात येईल असे समितीला विशद केले.

अभिप्राय व शिफारशी :

सन २००१ ते २००९ या कालावधीत अनुसूचित जमाती प्रवर्गातून ६४ शिक्षकांची पदे भरण्यात आली होती, या शिक्षकांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यामुळे त्यांच्या विरुद्ध जिल्हा न्यायालयात फौजदारी गुन्हा दाखल आहे. परंतु यासंदर्भात शासनाकडे तक्रारी करण्यात आल्या असता विभागीय आयुक्त स्तरावरून याप्रकरणी चौकशी करण्यात आली. उर्दू शिक्षकांना अनुसूचित जमाती प्रवर्गात आरक्षण नसताना भरण्यात आलेल्या ६४ उर्दू शिक्षकांना सेवेतून कमी करण्यात आले. संबंधित शिक्षकांनी याविरुद्ध न्यायालयात याचिका सादर केली आहे. न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये उर्दू शिक्षकांना सेवेत पुन:स्थापित करण्यात आले. न्यायालयाने सदर प्रकरणी विभागीय आयुक्तांकडे पुढील निर्णयासाठी प्रकरण सादर केले असता विभागीय आयुक्तांनी अशा शिक्षकांना फौजदारी गुन्ह्यांचा निकाल लागेपर्यंत सेवेत कायम ठेवण्यात यावे असे आदेश दिले. सबब, समिती शिफारस करते की, या शिक्षकांनी बनावट जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्यामुळे फौजदारी गुन्हा केव्हा करण्यात आला आहे. या कर्मचाऱ्यांना पोलिसांमार्फत अटक करण्यात आली होती काय? शिक्षकांविरुद्ध पोलिसांनी काय कारवाई केली आहे, या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून केलेल्या चौकशीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा. तसेच प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार तत्काळ कारवाई करण्यात यावी, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

(८) जिल्हा परिषद कार्यालयात कार्यरत असलेल्या श्रीमती रंजना गेडाम यांच्यावर झालेला अन्याय प्रकरणी

अनुसूचित जमातीच्या तत्कालीन समितीने दिनांक २४ जुलै २०१० रोजी (दुसरा अहवाल सन २०१०-११) (बारावी विधानसभा) सभागृहात सादर केला आहे. सदर अहवालात जिल्हा परिषद कार्यालय, अकोला येथे कार्यरत असलेल्या श्रीमती रंजना गेडाम यांच्यावर झालेल्या अन्याय प्रकरणी समितीने अहवालात शिफारशी केल्या आहेत. सदर विषय वारंवार समिती पुढे येत असल्याने त्यानंतर समितीच्या दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी जिल्हा परिषद कार्यालय, अकोला येथे झालेल्या बैठकीच्या वेळी श्रीमती रंजना गेडाम यांच्या तक्रारी संबंधी माननीय समिती सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला.

समितीने, श्रीमती रंजना हरीभाऊ गेडाम, से.नि.कक्ष अधिकारी यांना वर्ग-२ पदोन्नतीपासून वंचित ठेवण्याचा विषय आहे. श्रीमती रंजना हरीभाऊ गेडाम, से. नि. कक्ष अधिकारी यांनी केलेल्या तक्रारीमध्ये सन २००७-०८ च्या काळात कक्ष अधिकारी या पदाच्या सेवा ज्येष्ठता यादीतून डावलून त्यांचे पेक्षा कनिष्ठ असलेल्या श्री. महागांवकर व श्री. सोनकुसरे यांना अधिक्षक या पदाची खोटी मानिव तारीख देऊन कक्ष अधिकारी या पदावर श्रीमती रंजना गेडाम यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्शवून त्यांना वर्ग-२ पदावर पदोन्नती देण्यात आली असा स्पष्ट आरोप करण्यात आलेला आहे. एखाद्या व्यक्तीला जाणूनबुजून

चुकीच्या पद्धतीने पदोन्नती दिली. म्हणून या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्याची साक्ष घेण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

दिनांक ५ जुलै २०१७ रोजी झालेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या बैठकीत श्रीमती रंजना हरीभाऊ गेडाम, से. नि. कक्ष अधिकारी यांच्या प्रकरणी करण्यात आलेल्या स्पष्ट आरोपाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे लेखी स्वरूपात माहिती देण्यात आली.

कक्ष अधिकारी या संवर्गाची दिनांक १ जानेवारी २००७ चे तात्पुरत्या सेवा ज्येष्ठता यादीत श्रीमती रंजना हरीभाऊ गेडाम यांचे स्थान अ.क्र. ११ होते. परंतु श्री. संजय महागांवकर, तत्कालीन कक्ष अधिकारी यांनी श्री. एस. जी. मावळे व श्री. जी.के.वेले यांना दिनांक १३ मार्च १९९९ ला अधीक्षक व दिनांक ११ सप्टेंबर २००२ ला कक्ष अधिकारी या पदावर देण्यात आलेल्या पदोन्नतीचा मानीव दिनांक मिळणे बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे याचिका दाखल केली. दिनांक २१ फेब्रुवारी २००७ अन्वये श्री. संजय महागांवकर यांना अधीक्षक या पदाचा दिनांक १३ मार्च १९९९ व कक्ष अधिकारी या पदाचा दिनांक ११ सप्टेंबर २००२ च्या मानिव दिनांक मंजूर करण्यात आला असल्याने कक्ष अधिकारी या संवर्गाचे दिनांक १ जानेवारी २००७ अंतिम सेवा ज्येष्ठता सूचित सुधारणा करण्यात येऊन श्री. संजय महागांवकर यांचे तात्पुरत्या यादीत अ. क्र.१५ वर असलेले स्थान अ.क्र.१ वर निश्चित करण्यात आले होते. परिणामी श्री. संजय महागांवकर यांची मविसे गट-ब या संवर्गात गट विकास अधिकारी या पदावर शासनस्तरावरून पदोन्नती देण्यात आली आहे. श्री. सोनकुसरे यांनी न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणी मा. न्यायालयाने दिनांक ९ सप्टेंबर २००८ अन्वये प्राप्त अंतिम निकालाचे अधीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांचे आदेश दिनांक १७ नोव्हेंबर २००८ नुसार श्री. एस.पी.सोनकुसरे यांना अधिक्षक या पदाचा दिनांक १३ मार्च १९९९ व कक्ष अधिकारी या पदाचा मानीव दिनांक ११ सप्टेंबर २००२ असा मंजूर करण्यात आल्याने परिणामी श्री. एस.पी. सोनकुसरे यांची मविसे गट-ब या संवर्गात शासनस्तरावरून पदोन्नती देण्यात आली आहे.

श्रीमती रंजना हरीभाऊ गेडाम, से.नि.कक्ष अधिकारी यांचे बाबत अन्याय झाल्याने त्यांनी माननीय उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे दाखल केलेल्या याचिकेचा निकाल दिनांक २४ जुलै २००९ अन्वये त्यांना सुद्धा महाराष्ट्र विकास सेवा वर्ग-२ गट-ब या पदावर पदोन्नती देणे बाबत आदेशीत केल्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अकोला यांचे आदेशनुसार दिनांक १४ ऑक्टोबर २००९ रोजी श्री. संजय महागांवकर व श्री. एस.पी. सोनकुसरे यांना अनुक्रमे अधीक्षक या पदाचा दिनांक १३ मार्च १९९९ व कक्ष अधिकारी या पदाचा दिनांक ११ सप्टेंबर २००२ देण्यात आलेले मानीव दिनांक आदेश रद्द करून दिनांक १ जानेवारी २००९ रोजीचे अंतिम सेवा ज्येष्ठता यादीत श्रीमती रंजना हरीभाऊ गेडाम, से. नि. कक्ष अधिकारी यांचे अ. क्र.५ वर, श्री.एस.पी.सोनकुसरे यांचे अं.क्र. ६ वर आणि श्री. संजय महागांवकर यांचे अ.क्र. ९ वर स्थान निश्चित करून कार्यालयीन पत्र दिनांक ११ नोव्हेंबर २०१३ अन्वये माननीय विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांना सादर करण्यात आले आहे.

उपरोक्त प्रमाणे श्री. संजय महागांवकर व श्री. एस.पी.सोनकुसरे यांना देण्यात आलेले मानीव दिनांक आदेश रद्द केल्याचे परिणामी त्यांनी माननीय उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे याचिका दाखल करून दिनांक २९ जुलै २०१० नुसार मानीव दिनांक रद्द आदेशास स्थगिती मिळविल्यामुळे प्रकरण सद्य:स्थितीस न्यायप्रविष्ट आहे.

महाराष्ट्र विकास सेवा वर्ग-२ गट-ब हा संवर्ग माननीय विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांचे प्राधिकारांतर्गत असल्याने सदर बाबत त्यांचे मार्फत ज्याप्रमाणे निर्देश प्राप्त होतील त्यानुसार अकोला जिल्हा परिषद कार्यालयाला कार्यवाही करता येईल. अशी माहिती दिली.

उपरोक्त प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने साक्षीच्यावेळी समितीने सामान्य प्रशासन विभागातील कक्ष अधिकारी श्रीमती रंजना गेडाम सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या संवर्गात ज्येष्ठतेनुसार खानंदे यांना प्रथम खुल्या प्रवर्गातून पदोन्नती देण्यात आली. ही पदोन्नती कधी देण्यात आली व त्यानंतर त्यांचा अनुसूचित जमाती संवर्गामध्ये कधी समावेश करण्यात आला आहे, अशी विचारणा केली.

अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी श्रीमती रंजना गेडाम यांच्या प्रकरणी दिनांक १ जानेवारी, २००० च्या तात्पुरत्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये श्रीमती गेडाम यांचे नाव क्रमांक ११ वर होते. ज्यांच्या विरोधात त्यांनी तक्रार केली त्या श्री. संजय म्हाळगावकर यांचे नाव त्यांच्यापेक्षा खाली होते. श्री. म्हाळगावकर हे खुल्या प्रवर्गाचे आहेत. त्यांच्या खाली असणारे श्री. मावळे व श्री. वेले यांना अनुसूचित जमाती प्रवर्गातून पदोन्नती मिळाली व म्हणून म्हाळगावकर यांनी त्यांची डिम्ड डेट मिळण्यात यावी अशी उच्च न्यायालयात मागणी केली. माननीय उच्च न्यायालयाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घेण्यात यावा असे सांगितले. मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी म्हाळगावकर यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यांना ज्या तारखेला पदोन्नती मिळाली ती तारीख त्यांना डिम्ड डेट म्हणून दिली. त्यामुळे सेवाज्येष्ठता यादीमध्ये सुधारणा करण्यात आली व श्रीमती रंजना गेडाम यांच्या वर श्री. म्हाळगावकर यांचे नाव समाविष्ट करण्यात आले व म्हाळगावकर यांना पदोन्नती मिळाली. त्यानंतर श्री. म्हाळगावकर यांच्यापेक्षा ज्येष्ठ असलेल्या खुल्या प्रवर्गातील श्री. सोनकुसरे यांनीही उच्च न्यायालयात डिम्ड डेट मिळण्याबाबत मागणी केली व यामध्ये माननीय उच्च न्यायालयाने पूर्वीप्रमाणेच आदेश दिले. पुन्हा मुख्य कार्यकारी आधिकारी यांनी या प्रकरणात निर्णय घेऊन श्री. सोनकुसरे यांना डिम्ड डेट दिली. त्याआधारे श्रीमती रंजना गेडाम कोर्टात गेल्या. न्यायालयाकडून डिम्ड डेट रद्द करण्यात आल्या. त्यामुळे श्रीमती रंजना गेडाम यांची सेवाज्येष्ठता कायम झाली. या आदेशाने व्यथित होऊन आपण पदोन्नती दिलेले श्री. म्हाळगावकर व श्री. सुनकुसरे उच्च न्यायालयात गेले. माननीय उच्च न्यायालयाने हे प्रकरण विभागीय आयुक्तांकडे पाठविले व त्यांनी योग्य तो निर्णय घेण्याबाबत निर्देश दिले. त्यानंतर विभागीय आयुक्तांनी या तारखा रद्द केल्या व त्यानंतर आम्ही सेवाज्येष्ठता दुरुस्त करून श्रीमती रंजना गेडाम यांना वर्ग दोन मध्ये पदोन्नती मिळण्यासाठी विभागीय आयुक्त यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. दरम्यान श्रीमती रंजना गेडाम सेवानिवृत्त झाल्या. असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

समितीने, श्रीमती रंजना गेडाम यांच्यावर झालेल्या अन्यायाला सर्वस्वी जबाबदार कोण? कार्यालयीन कामकाजामुळे या स्त्री कर्मचाऱ्यावर अन्याय झाला, वारंवार त्यांना न्यायालयात जावे लागले. याला सर्वस्वी जबाबदार प्रशासन आहे. यामध्ये कोणाला जबाबदार ठरवायचे, हे कार्यालयाने ठरवावयाचे आहे. माननीय उच्च न्यायालयाने श्री. गावकर यांना पदोन्नती द्या असे आदेश दिले होते का? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबतची तपासणी करणे आवश्यक होते. परंतु तपासणी न करता त्यांनी आदेश काढले आहे अशी विचारणा केली.

अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री. म्हाळगांवकर यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेले श्री. वेले व श्री. मावळे यांना अनुसूचित जमाती प्रवर्गातून पदोन्नती दिली. त्यामुळे श्री. म्हाळगावकर यांनी माझ्यापेक्षा कनिष्ठ असताना त्यांना पदोन्नती मिळाली म्हणून त्यांची डिम्ड डेट मला मिळावी अशी उच्च न्यायालयात मागणी केली. त्याप्रमाणे माननीय उच्च न्यायालयाने सदर प्रकरण मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठविले. असे समितीला सांगितले. समितीने श्रीमती रंजना गेडाम या अनुसूचित जमाती प्रवर्गातील असताना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हे चुकीचे आदेश कसे काढले, यास जबाबदार कोण, अशी विचारणा केली. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी श्रीमती गेडाम या ज्येष्ठ होत्या व त्याप्रमाणे त्या सेवाज्येष्ठता यादीमध्ये होत्या. परंतु अनुसूचित जमातीमध्ये नसलेले दुसरे कर्मचारी उच्च न्यायालयात गेले व माननीय उच्च न्यायालयाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घेण्याचे निर्देश दिले. त्यांनी काय निर्णय घ्यावा हे न्यायालयाने सांगितले नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या निर्णयामुळे श्री. म्हाळगावकर सेवाज्येष्ठ झाले. हे पाहून दुसऱ्या व्यक्तींनी पुन्हा असेच केले व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांनाही हाच नियम लावल्यामुळे ते देखील सेवाज्येष्ठ झाले. त्यानंतर श्रीमती गेडाम उच्च न्यायालयात गेल्या व माननीय उच्च न्यायालयाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा आदेश रद्दबातल केला. यामध्ये न्यायलयीन प्रकरणामुळे वेळ लागला व सदर कर्मचारी पदोन्नतीशिवाय सेवानिवृत्त झाल्या. यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयाकडूनही कदाचित थोडा फार उशीर झाला असेल. परंतु यासाठी कोणाला जबाबदार धरणार हे अवघड आहे. असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्रीमती रंजना गेडाम यांना प्रथम प्राधान्य देणे आवश्यक होते. त्यानुसार श्रीमती गेडाम यांना प्रथम पदोन्नती दिली नाही. अशी विचारणा केली. प्रधान सचिव,, ग्रामविकास विभाग यांनी श्रीमती गेडाम ह्या पदोन्नती यादीमध्ये वरच्या स्थानावर होत्या. परंतु त्यांना पदोन्नती देण्यात आलेली नाही. त्यांना कार्यमुक्त करून सी. ई. ओ. यांनी आदेश काढले. श्रीमती गेडाम यांनी न्यायालयामध्ये प्रकरण दाखल केले. न्यायालयाने श्रीमती गेडाम यांच्या बाजूने निर्णय दिला. असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

समितीने यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांचे चार ते पाच वर्षे नुकसान झालेले आहे. या प्रकरणातील नस्ती तपासून न्यायालयामध्ये तत्कालीन सी. ई. ओ. यांनी कोणते ॲफिडिव्हिट दाखल केले यामध्ये सर्व बाबी तपासून संबंधितावर जबाबदारी निर्धारित करावी. यामध्ये जी नुकसानभरपाई झालेली आहे ती कोण देणार? अशी विचारणा केली, असता प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांनी न्यायालयामध्ये जे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे त्याची चौकशी करून व सामान्य प्रशासन विभागाचे मार्गदर्शन घेऊन याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात येईल, असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

जिल्हापरिषद कार्यालयात कार्यरत असलेल्या सेवानिवृत्त कक्ष अधिकारी, श्रीमती रंजना गेडाम यांच्यावर झालेल्या अन्यायप्रकरणी तत्कालीन समितीने दिनांक २४ जुलै २०१० रोजी सभागृहात सादर केलेल्या अहवालात शिफारशी केलेल्या आहेत. श्रीमती गेडाम सेवानिवृत्त कक्ष अधिकारी यांना सेवा ज्येष्ठता यादीमधून डावलून त्यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यांना वर्ग-२ च्या पदावर पदोन्नती देण्यात आलेली आहे व श्रीमती रंजना गेडाम यांना वर्ग-२ च्या पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात आले आहे.

दिनांक १ जानेवारी, २००७ रोजीच्या तात्पुरत्या सेवा ज्येष्ठता यादीनुसार श्रीमती रंजना गेडाम यांना दर्शविण्यात आलेल्या बिंदूच्यावर श्री. संजय महागांवकर व श्री. सोनकुसरे यांनी मानीव दिनांक मिळणेबाबत मा. उच्च न्यायालयात याचिका सादर केली असता न्यायालयाच्या अंतिम निकालचे अधीन राहून श्री. महागांवकर व श्री. सोनकुसरे यांना पदोन्नती देण्यात आली. उपरोक्त पदोन्नती देण्यात आलेल्या अंतिम ज्येष्ठता यादीमध्ये श्रीमती रंजना गेडाम यांच्या बिंदू क्रमांकाच्या वर श्री. महागांवकर व श्री. सोनकुसरे यांची नावे दर्शविण्यात आली.

श्रीमती रंजना गेडाम सेवानिवृत्त कक्ष अधिकारी यांनी त्यांच्यावर झालेल्या अन्यायप्रकरणी मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ, नागपूर येथे दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने न्यायालयाने श्रीमती गेडाम यांना वर्ग-२ ब या पदावर पदोन्नती देणेबाबत आदेशित केले व यापूर्वी श्री.महागांवकर व श्री.सोनकुसरे यांना देण्यात आलेले मानीव दिनांकाचे आदेश रद्द करण्यात आले. त्यानंतर उक्त दोन्ही कर्मचाऱ्यांचा मानीव दिनांक आदेश रद्द केल्याने त्या कर्मचाऱ्यांच्या मार्फत पुन्हा मा.उच्च न्यायालयात प्रकरण सादर करण्यात आले आहे.

सद्यःस्थिती श्रीमती रंजना गेडाम सेवानिवृत्त झाल्या असून त्यांच्यावर झालेल्या अन्यायाला सर्वस्वी प्रशासन जबाबदार आहे, असे समितीचे मत आहे. तसेच न्यायालयीन प्रकरणामुळे श्रीमती गेडाम पदोन्नती शिवाय सेवानिवृत्त झाल्या आहेत. श्रीमती गेडाम यांना प्रथम प्राधान्य देऊन पदोन्नती देणे आवश्यक होते. परंतु पदोन्नती देण्यात आली नाही. त्यामुळे श्रीमती गेडाम यांचे आर्थिक नुकसान झालेले आहे. श्रीमती गेडाम या पदोन्नती पासून वंचित राहिल्यामूळे जे आर्थिक

नुकसान झालेले आहे ती नुकसानभरपाई श्रीमती गेडाम यांना देण्याबाबत प्रथम त्वरित निर्णय घेण्यात यावा तसेच या प्रकरणी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचे मार्गदर्शन घेऊन व सविस्तर चौकशी करून तीन महिन्यांच्या आत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या चौकशीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

तसेच जिल्हापरिषद कार्यालयातील श्रीमती गेडाम यांच्याप्रकरणी प्रशासन म्हणून जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी वर्ग यांच्याविरुद्ध कडक कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.

(९) अपूर्ण असलेली रस्त्यांची कामेः-

समितीने रस्त्याच्या कामासाठी वितरित करण्यात आलेल्या निधीतून रस्त्यांची कामे पूर्ण झालेली आहेत काय व केव्हा पूर्ण झालेली आहेत. अशी विचारणा केली असता जिल्हाधिकारी यांनी समितीने अकोट, तेल्हार, अकोला व पातूर या चार तालूक्यातील केलेल्या दौऱ्याच्या वेळी तीन तालुक्यातील रस्त्यांची दुरावस्था झालेली असून याबाबतची माहिती समितीला अवगत करून देण्यात येईल.

समितीच्या दौऱ्यादरम्यान बऱ्याच ठिकाणी रस्त्यांच्या दुरावस्थेचे प्रश्न समोर आलेले होते. त्या संदर्भात सूचना देखील करण्यात आलेल्या होत्या. तेव्हा रस्त्यांची अपूर्ण कामे पूर्ण करून समितीला अहवाल सादर करावयाचा होता, परंतु तो केलेला नाही. जिल्हाधिकारी कार्यालया कडून प्राप्त झालेल्या माहितीमध्ये मोघम स्वरूपाचे अभिप्राय देण्यात आलेले आहेत. त्यामध्ये रस्त्यांच्या कामाकरिता प्राप्त झालेल्या निधीचा योग्यरित्या वापर होतो अथवा नाही त्याबाबतचा आढावा समितीने दिलेल्या सूचनेप्रमाणे घेण्यात आला आहे काय. तिन्ही तालूक्यामध्ये रस्त्यांच्या कामाची दुरावस्था झालेली आहे आणि जी अर्धवट कामे आहेत ती पूर्ण करून त्या संदर्भातील अहवाल समितीला सादर करण्यास सांगितले होते. परंतु सूचनेप्रमाणे आढावा घेण्यात येत आहे, अशा प्रकारचे मोघम स्वरूपाचे उत्तर दिलेले आहे. सदर कामे झालेली आहेत किंवा नाही. जी कामे अपूर्ण होती ती कामे पूर्ण झाली पाहिजेत. या संदर्भातील माहिती घेऊन समितीला आठ दिवसामध्ये अहवाल सादर करण्यात यावा.

अभिप्राय व शिफारशीः

समितीला अकोट, तेल्हारा, अकोला व पातूर या चार तालुक्यांतील रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे, असे निदर्शनास आले. रस्त्यांच्या कामाकरीता प्राप्त झालेला निधीचा उपयोग योग्य रितीने झाला आहे किंवा नाही याची तपासणी करण्यात यावी व अपूर्ण कामे पूर्ण करून समितीला अहवाल सादर करावा, असे समितीने निदेश दिलेले असतांना सुचनेप्रमाणे आढावा घेण्यात येत आहे. असे मोघम स्वरुपाचे उत्तर दिलेले आहे. सबब, चारही तालुक्यांतील रस्त्यांची दुरावस्था

झालेली आहे व या कामावर करण्यात आलेला खर्च निष्फळ गेलेला असल्याने जबाबदार असणाऱ्या कार्यकारी अभियंता, उप अभियंता व इतर अधिकाऱ्यांविरूद्ध कारवाई करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा तसेच उपरोक्त रस्त्यांची कामे पूर्ण झाल्याचा अहवाल समितीला १५ दिवसांच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

(१०) शेतजमिनीचे शासनाला हस्तांतरण करणेः-

समितीची जिल्हाधिकारी, कार्यालय येथे झालेल्या बैठकीच्यावेळी समितीने श्री संजय भोयर, मु. पो. विझोरा यांनी शेतीचा ताबा मिळण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडे विनंती केली असून मागील एक वर्षापासून तहसीलदार, उप जिल्हाधिकारी व जिल्हाधिकारी यांनी त्याच्या प्रकरणाबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. त्याचप्रमाणे श्री. रामदास सिताराम मराळी, यांनी शेतजमीन विकण्याबाबत परवानगी मागीतली असून त्यांचे प्रकरण एक वर्षापासून प्रलंबित आहे अशी विचारणा केली. जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणाची सर्व कागदपत्रे सादर करावी. या प्रकरणी कार्यवाही करण्यात येईल, असे समितीला आश्वासित केले.

दिनांक ५ जुलै २०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने श्री. संजय भोयर आणि इतर तीन व्यक्ती यांनी जमिनीचे हस्तांतरण शासनाची पूर्व परवानगी न घेता केलेले आहे. त्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने काय कार्यवाही केलेली आहे. अशी विचारणा केली. जिल्हाधिकारी यांनी यामध्ये शर्तभंग झालेला असून शर्तभंगाची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर जागा ही शासन जमा करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. यामध्ये गट नंबर ६५/२ ची संपूर्ण जागा ही २.९ हेक्टर होती. त्यामध्ये जमिनीचे झालेले हस्तांतरण हे शासनाची कोणतीही पूर्व परवानगी न घेता झालेले असल्याने सदर शेत जमीन संदर्भात शर्तभंग झाल्याचे सिद्ध होत आहे. तहसीलदार यांनी चौकशी करून शर्तभंग झाला आहे, अशा प्रकारचा अहवाल दिलेला आहे. आता सदर जागा शासन जमा करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. श्री. रामदास सिताराम मराळी यांच्या शेतजमीन विक्री करणेबाबतचा अर्ज प्रलंबित आहे काय, याबाबत त्यासंबंधित कर्मचाऱ्यास प्रत्यक्ष बोलावून विचारले असता, श्री मराळी यांचा कोणताही अर्ज प्रलंबित नसल्याबाबत संबंधित कर्मचाऱ्याने अवगत केल्यानुसार श्री. मराळी यांचा अर्ज या कार्यालयास प्रलंबित नाही. असे समितीला सांगितले.

समितीने विभागाने दिलेले अभिप्राय नुसार याबाबतची संपूर्ण कार्यवाही करण्यात यावी, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु अजूनही एस. डी. ओ. च्या स्तरावर कार्यवाही सुरू आहे. सदर प्रकरणी एक महिन्याच्या आत कार्यवाही करून त्याचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा, असे समितीने निदेश दिले.

अभिप्राय व शिफारशी :

श्री.संजय भोयर आणि इतर तीन व्यक्ती यांनी शासनाची परवानगी न घेता शेतजमिनीचे हस्तांतरण केले आहे. त्यामुळे शेतजमीन संदर्भात शर्तभंग झाला आहे असा अहवाल तहसिलदार यांनी चौकशी करून दिला आहे. सदर जागा शासनखाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी, अशा प्रकारच्या सुचना दिलेल्या असताना प्रांत अधिकारी स्तरावरुन कार्यवाही झालेली नाही. सबब, जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार याप्रकरणी प्रांत अधिकाऱ्यांच्या स्तरावरुन कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

(११) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत अपूर्ण असलेली कामे-

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नागपूर

समितीने एकलव्य मुलांचे वसतीगृह, खैरी, परसोडा ता. रामटेक या वसतीगृहाला भेट दिली असता अपूर्ण असलेले सपाटीकरणाचे बांधकाम पूर्ण झाले आहे काय अशी विचारणा केली असता अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपूर यांनी, एकलव्य मुलांचे वसतीगृह, खैरी, परसोडा ता. रामटेक या इमारतीचे दिनांक २९ सप्टेंबर २०१६ रोजी बांधकाम सुरू झाले होते. सध्या लेव्हलींगचे काम सुरू आहे. परंतु मध्यंतरीच्या काळामध्ये तेथे हार्ड रॉक लागल्यामुळे अंदाजपत्रकात बदल झाले होते. त्यामुळे काम थांबले होते, सध्या काम सुरू असून सदर काम हे पुढील दोन वर्षामध्ये होईल असे समितीला सांगितले.

समितीने, या वसतिगृहामध्ये जवळपास ३५० विद्यार्थी असून त्यांच्यासाठी एकच संगणक उपलब्ध आहे. यामध्ये एकूण दहा संगणकापैकी आठ संगणके दुरूस्त होण्यासारखे नाहीत असे अभिप्राय आपल्या विभागाने दिलेले आहेत. ३५० विद्यार्थ्यांमागे तीन संगणक अपेक्षित आहेत काय, याबाबत काही नियम आहेत किंवा नाही या प्रकरणी खुलासा करण्यास सांगितले असता अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग नागपूर यांनी समितीने भेट दिली तेव्हा एक संगणक होता. सध्या तीन संगणके आहेत. तसेच जे ना दुरूस्त संगणक होते त्यांपैकी एक दुरूस्त झालेला असून जानेवारी, २०१६ मध्ये एका संगणकाचा पुरवठा झालेला आहे. एकूण तीन संगणके चालू आहेत.

समितीने किती विद्यार्थ्यामागे किती संगणक असावेत यासाठी कोणत्याही प्रकारचे निकष अद्यापपर्यंत ठरविलेले नाहीत काय, अशी विचारणा केली असता उप सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी सध्या संगणकाचे कोणत्याही प्रकारचे निकष ठरविण्यात आलेले नाहीत. लवकरच ठरविण्यात येतील असे समितीला आश्वासित केले.

अभिप्राय व शिफारशी :

एकलव्य मुलांचे वसतिगृह, खैरी, परसोडा ता. रामटेक या वसतिगृहाच्या इमारतीचे अपूर्ण स्थितीत असलेले बांधकाम समितीला दिलेल्या आश्वासनाप्रमाणे पूर्ण करण्यात यावे व काम पूर्ण झाल्याचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

तसेच या वसतिगृहामध्ये ३५० विद्यार्थी राहत असून विभागाने या विद्यार्थ्यांसाठी फक्त तीन संगणक पूरविले आहेत. समितीने किती विद्यार्थ्यांच्यामागे एक संगणक असावे, याचे काही निकष ठरविण्यात आलेले नसताना ३५० विद्यार्थांना फक्त ३ संगणक उपलब्ध करून देण्यात आले आहेत अशी माहिती मिळाली.

सबब आदिवासी आश्रम शाळेत शिकणाऱ्या व वसतिगृहात राहणाऱ्या मुलांना संगणकाचे ज्ञान प्रगत होण्याच्या दृष्टिने आदिवासी विकास विभागाने वसतीगृहात राहणाऱ्या मुलांसाठी संगणक पुरविण्याचे निकष ठरविण्याबाबत त्वरित निर्णय घ्यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

समितीने शासनाच्या धोरणानुसार एका जिल्ह्यात किती अनुदानित आश्रमशाळा असल्या पाहिजेत. त्यासाठी लोकसंख्या असा काही आधार आहे काय, सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा केली. उप सचिव,, आदिवासी विकास विभाग यांनी डीएसटीएम एरियामध्ये ५ ते ७ हजार लोकसंख्येमागे एक आश्रमशाळा असणे आवश्यक आहे असे शासनाचे धोरण आहे. दोन्ही शासकीय आणि अनुदानित शाळांचा समावेश आहे. सद्यः अनुदानित शाळा तर बंदच झाल्या आहेत. ते काम शासन करीत आहे. शासनाचे नेमके धोरण काय आहे अशी विचारणी केली असता उप सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी श्रेणीवाढ नसल्यामुळे मराठी माध्यम नसेल तर किमान नामांकित शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पाठविण्यात यावे, अशी सूचना दिलेल्या आहेत. श्रेणीवाढच्या संदर्भात मंत्रीमंडळाच्या बैठकीसमोर मंजुरीसाठी प्रस्ताव आहे, असे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

समितीने हा विद्यार्थ्यांच्या आयुष्याचा प्रश्न आहे. कारण कोणताही विद्यार्थी असो किंवा पालक असो, प्रत्येकाला असे वाटत असते की, मुलाला चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. त्यामुळे शासनाच्या ज्या आश्रमशाळा असतील किंवा नामांकित शाळा असतील तेथे ते शिक्षण घेतात. या शाळांमधून चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळाले पाहिजे. वर्ग १ ते ४ चा पट सर्वात कमी होण्याचे कारण हेच आहे ज्यावेळी विद्यार्थी ८ वी, ९ वी किंवा १० वी मध्ये जातो त्यावेळी आश्रमशाळेतील निकालाची प्रत इतर शाळांच्या प्रमाणात जो निकाल असतो तो अपेक्षानुसार नसतो. त्यामुळे नामांकित शाळांकडील ओढा जास्त असून वर्ग १ ते ४ मध्ये आश्रमशाळेत जाणारे विद्यार्थी कमी झाले आहेत ही वस्तुस्थिती आहे. आदिवासी विकास विभागाच्या आश्रम शाळेत प्रवेश होत नसतील तर ८ वी च्या विद्यार्थ्यांना किमान नामांकित शाळांमध्ये प्रवेश मिळवून द्यावा. परंतु विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडू नये या दृष्टिने तातडीने कार्यवाही करण्यात यावी.

अभिप्राय व शिफारशीः

शासनाच्या धोरणानुसार आदिवासी भागात राहणाऱ्या ५ ते ७ हजार लोकसंख्येच्यामागे शासकीय किंवा अनुदानित यांपैकी एक आश्रमशाळा असणे आवश्यक आहे. सद्यःस्थितीत अनुदानित आश्रम शाळा बंद होत असल्याने तेथे शिक्षण घेणाऱ्या मुलांचे समायोजन अन्य आश्रमशाळेत करावे लागते. त्यामूळे काही विद्यार्थी लांब असणाऱ्या आश्रमशाळेत जाण्यास तयार होत नाही व त्याला विद्यार्थ्यांच्या पालकाची मंजूरी मिळत नाही.

ज्या आश्रमशाळा सद्या अस्तित्वात आहेत, त्या आश्रमशाळांना श्रेणी वाढ नसल्यामुळे मराठी माध्यम नसेल तर नामांकित शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पाठविण्यात यावे. तसेच राज्यात अस्तित्वात असलेल्या आश्रम शाळेच्या श्रेणीवाढ संदर्भात शासनाकडे सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मंजूरी मिळण्याच्या दृष्टिने तत्काळ कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला पाठविण्यात यावा.

प्रकल्प कार्यालय, अकोला

समितीने स्वर्गवासी सुशिलाबाई देशमुख आदिवासी आश्रमशाळा, मेडशी खालाकामठा, ता. पातूर येथील आश्रम शाळेला भेट दिली असता आश्रमशाळेतील विद्यार्थी यात्रेला गेले होते. एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थी जत्रेला जातात का? अशी विचारणा केली, असता अपर आयुक्त आदिवासी विकास अमरावती यांनी सदर प्रकरणी शाळेची मान्यता रद्द करण्याबाबत प्रकल्प अधिकारी यांचेकडून आलेला प्रस्ताव आयुक्तांकडे मार्च, २०१७ मध्ये पाठविण्यात आला आहे. त्यावर आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय यांनी या प्रकरणी सुनावणी घेण्यात येईल असे समितीला सांगितले. समितीने सुशिलाबाई देशमुख आश्रमशाळेमध्ये १०० टक्के उपस्थिती दाखविण्यात आली होती, परंतु प्रत्यक्षात तेथे ५० टक्के देखील विद्यार्थी हजर नव्हते. याबाबत किती दिवसांमध्ये कार्यवाही पूर्ण होईल. अशी पून्हा विचारणा केली असता आयुक्तांनी या प्रकरणी लवकरच सूनावणी लावून पुढील कार्यवाही करण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

समितीने, मुंगसाजी महाराज आदिवासी प्राथमिक-माध्यमिक आश्रमशाळा, नरसांगवी, ता. पातूर येथे समितीने भेट दिली असता, तेथे एकूण विद्यार्थीसंख्या ३६३ होती तर उपस्थित विद्यार्थ्यांची संख्या १६८ एवढी होती. या शाळेमधील देखील १९५ विद्यार्थी यात्रेसाठी गेलेले होते असे समितीस निदर्शनास आले. यावर अपर आयुक्त, आदिवासी विभाग अमरावती यांनी समितीचा दौरा झाल्यानंतर या शाळेला देखील आमच्या वेळा भेट दिली आहे. समितीने भेटी दरम्यान काढलेल्या त्रुटींची अद्यापपर्यंत शाळेने पूर्तता केलेली नाही. त्यामुळे सदर शाळेची मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव ३-४ दिवसांपूर्वी प्राप्त झाला आहे. सदर प्रस्ताव आयुक्तांना सादर करतो. त्यानंतर आयुक्त नैसर्गिक न्यायानुसार एक वेळ सुनावणी घेऊन त्यानंतर निर्णय घेण्यात येईल. असे समितीला सांगितले.

अभिप्राय व शिफारशीः

स्वर्गवासी सुशिलाबाई देशमुख आदिवासी आश्रमशाळा, मेडशी खालाकामठा, ता. पातूर व मुंगसाजी महाराज आदिवासी प्राथमिक-माध्यमिक आश्रमशाळा, नरसांगवी, ता. पातूर या दोन्ही आश्रमशाळाना समितीने भेट दिली असता विद्यार्थी गावातील जत्रेकरिता गेलेले असल्याने फारच कमी प्रमाणात शाळेत विद्यार्थी आढळून आले आहे. अप्पर आयुक्त अमरावती, यांनी दोन्ही आश्रम-शाळेची तपासणी केली असता, विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी प्रमाणात आढळून आली असल्यामुळे दोन्ही आश्रम शाळेची मान्यता रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. सबब, आदिवासी विकास आयुक्तालयाने, उपरोक्त दोन्ही शाळेच्या प्रकरणी एक महिन्याच्या आत सुनावणी घेऊन आश्रमशाळा रद्द करण्याचा निर्णय घेण्यात यावा व घेतलेल्या निर्णयाची प्रत समितीला तात्काळ पाठविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

(शा.म.मु.) एचबी ३२०६—४ (६००—३-२०१८)

(समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

पहिली बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ७ ऑक्टोबर २०१५ रोजी जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद, कार्यालय, नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थितीः

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(४) श्री. प्रभुदास भिलावेकर वि.स.स
(५) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(६) श्री काशिराम पावरा, वि.स.स.
(७) श्री.पांडुरंग बरोरा वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिव,ालय

श्री. ना.रा. थिटे, उप सचिव,.
श्री. संजय कांबळे, अवर सचिव, (समिती)
श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद कार्यालय, नागपूर

(१) श्री. सचिन कुर्वे, जिल्हाधिकारी
(२) श्री. शिवाजी जोंधळे, मुख्य कार्यकारी अधिकारी
(३) श्री. कृष्णा फिरके, जिल्हा नियोजन अधिकारी
(४) श्री. रविंद्र कुंभारे, निवासी उप जिल्हाधिकारी
(५) श्री. एन. पी. शेवगावकर, का.अ.,सा.बां.वि.
(६) श्री. एम. एस. नेटके, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं.

आदिवासी विकास आयुक्तालय,

(१) डॉ. माधवी खोडे, अपर आयुक्त, आदिवासी विकास
(२) श्री. एच. एम. मढावी, प्रकल्प अधिकारी, नागपूर

अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर

(१) श्रीमती वसुधा नाईक, प्रभारी सहाय्यक आयुक्त
(२) श्रीमती बबिता गिरी, उप संचालक

विभागीय आयुक्त कार्यालय, मागासवर्ग कक्ष

श्री. पी. एस. चौबळ, सहा. आयुक्त, नागपूर

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचांऱ्याच्या जात पडताळणीविषयक प्रकरणे तसेच जिल्हापरिषद यंत्रणांकडून आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

दुसरी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची आढावा बैठक दिनांक ९ ऑक्टोबर २०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(४) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(५) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(६) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
(७) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स

महाराष्ट्र विधानमंडळ सचिव,ालय

(१) श्री. ना.रा. थिटे, उप सचिव,.
(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव, (समिती)
(३) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

विभागीय प्रतिनीधी :

(१) श्री.सचिन कुर्वे, जिल्हाधिकारी, नागपूर
(२) श्री.शिवाजी जोंधळे,मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नागपूर
(३) श्री.अरूण निंबाळकर, उप मुख्य कार्यकारी, अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नागपूर
(४) श्री.रविद्र कुंभारे, निवासी उप जिल्हाधिकारी
(५) डॉ.यु.बी. नवादे,जिल्हा शल्य चिकित्सक,नागपूर
(६) डॉ योगेंद्र सवाई, जिल्हा आरोग्य अधिकारी
(७) श्री.विवेक बोंदरे,उप मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नागपूर
(८) श्री.ए.म.एस.नेटके,प्रकल्प संचालक,जिग्राविप्र
(९) श्री. अनिल कोल्हे,शिक्षणाधिकारी (प्राथमिक), नागपूर

आदिवासी विकास आयुक्त कार्यालय, (नागपूर)

(१) डॉ. माधवी खोडे, अपर आयुक्त
(२) श्री.एच.एम.मढावी,प्रकल्प अधिकारी
(३) श्री.एस.डब्ल्यु.सावरकर,उपायुक्त, आदिवासी विकास विभाग

अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर

(१) श्रीमती वसुधा नाईक, प्र.सहआयुक्त

(२) श्रीमती बबिता गिरी, उप संचालक

विभागीय आयुक्त कार्यालय, मागासवर्ग कक्ष, नागपूर

श्री. पी.एस.चौबळ. सहा.आयुक्त

उक्त बैठकीत समितीने दिनांक ७ ऑक्टोबर २०१५ रोजी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर येथे झालेल्या बैठकीच्यावेळी समितीस आश्वासित केलेल्या मुद्याबाबत व समितीने आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कामांना दिलेल्या भेटीच्यावेळी आढळून आलेल्या त्रुटी संदर्भात आढावा बैठक घेऊन संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

तिसरी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २९ जानेवारी, २०१६ रोजी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालय, अकोला येथे झाली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

१) श्री.रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.राजू. तोडसाम, वि.स.स.
३) श्री.पास्कल धनारे, वि.स.स.
४) श्री.चंद्रकांत सोनवणे, वि.स.स
५) श्री.काशिराम पावरा वि.स.स.
६) श्री.पांडुरंग बरोरा, वि.स.स

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री. ना.रा.थिटे, उप सचिव,
(२) श्री.संजय कांबळे, अवर सचिव, (समिती)
(३) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद कार्यालय, अकोला

१) श्री. शिवाजी दिवेकर, अपर जिल्हाधिकारी, अकोला
२) श्री. श्रीकांत देशपांडे, निवासी उप जिल्हाधिकारी
३) श्री. देवेंदर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला
४) श्री. एस.एम. पवार, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला

विभागीय आयुक्त कार्यालय, (मावक) अमरावती

श्री. ज. भी. अपाले, सहायक आयुक्त
श्री. राजेंद्र धणबहादूर, सहा. आयुक्त

आदिवासी विकास विभाग, अकोला

श्री. नितीन तायडे, प्रकल्प अधिकारी
श्री. डी. एम. खोकले, सहा. प्रकल्प अधिकारी

अनुसूचित जमाती जात पडताळणी समिती, अमरावती

श्रीमती वसुधा नाईक, उप संचालक

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्यांच्या जात पडताळणीविषयक प्रकरणे तसेच जिल्हा परिषद यंत्रणांकडून आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

चौथी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची आढावा बैठक दिनांक ३० जानेवारी, २०१६ रोजी पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला येथे आयोजित केली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

१) श्री.रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री.राजू तोडसाम, वि.स.स.
३) श्री.पास्कल धनारे, वि.स.स.
४) श्री.चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.
५) श्री.काशिराम पावरा वि.स.स.
६) श्री.पांडुरंग बरोरा, वि.स.स

महाराष्ट्र विधानमंडळ सचिव,ालय

(१) श्री. ना.रा. थिटे, उप सचिव,
(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव, (समिती)
(३) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी, अकोला
(२) श्री. एम. देवेंदर सिंह, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., अकोला
(३) श्री. श्री. शिवाजी दिवेकर, अतिरिक्त जिल्हाधिकारी, अकोला
(४) श्री. सुभाष पवार, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
(५) श्री. अंबादास मानकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प., अकोला

विभागीय आयुक्त कार्यालय, मागासवर्ग कक्ष, अमरावती

श्री. ज. भी. अपाले, सहायक आयुक्त

आदिवासी विकास विभाग, अकोला

श्री. नितीन तायडे, प्रकल्प अधिकारी

अनुसूचित जमाती जात प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती

श्रीमती वसुधा नाईक, उप संचालक

उक्त बैठकीत समितीने दिनांक २९ जानेवारी २०१६ रोजी जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद कार्यालय अकोला येथे झालेल्या बैठकीच्यावेळी समितीस आश्वासित केलेल्या मुद्याबाबत व समितीने आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कामांना दिलेल्या भेटीच्यावेळी आढळून आलेल्या त्रुटी संदर्भात आढावा बैठक घेवुन संबंधित अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली.

पाचवी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक ५ जुलै २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख.
२) डॉ. अशोक उईके, वि.स.स.
३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.
५) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
६) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
७) श्री. संजय पुराम, वि.स.स.
८) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
९) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिव,ालय

(१) श्री. ना.रा.थिटे, उप सचिव,
(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव, (समिती)
(३) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

मंत्रालयीन अधिकारी :

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसूल विभाग.
(२) श्री. बाजीराव जाधव, सचिव, सामान्य प्रशासन विभाग.
(३) श्री. असिम गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग.
(४) श्री. सु. ना. शिंदे, उप सचिव, आदिवासी विकास विभाग.
(५) श्री. डॉ. माधव वीर, उप सचिव, महसूल विभाग.
(६) श्री. ल. गो. ढोके, उप सचिव, आदिवासी विकास विभाग.
(७) श्री. टि. वा. करपते, उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग.

विभागीय प्रतिनिधी :

(१) श्री. एस. रामामूर्ती, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला.
(२) श्री. डॉ. कादंबरी बालकवडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर.
(३) श्री. आर. जी. कुलकर्णी, आयुक्त आदिवासी आयुक्तालय, नाशिक.

(४) श्री. नरेंद्र पोयाम, आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
(५) डॉ. माधवी खोडे, अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर.
(६) श्री. गिरिश सरोदे, अपर आयुक्त, आदिवासी विभाग.
(७) श्री. सुभाष पवार, अतिरिक्त मुख्य अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला.
(८) श्री. अस्तिक पांडे, अतिरिक्त जिल्हाधिकारी, अकोला.
(९) श्री. विलास खिल्लारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
(१०) श्री. घनश्याम भुगांवकर, सहआयुक्त, मागासवर्गीय कक्ष.
(११) श्री. विनोद पाटील, सह. आयुक्त, जात पडताळणी समिती, नागपूर.
(१२) श्री. राव, निवासी उप जिल्हाधिकारी नागपूर.
(१३) श्रीमती विनिता सोनवणे, प्रकल्प अधिकारी, अकोला.
(१४) श्रीमती सपकाळ, प्रकल्प अधिकारी, नागपूर.

समितीने या बैठकीत जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद नागपूर व अकोला या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा, भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातंर्गत कामांना दिलेल्या भेटीच्या संदर्भात आढळून आलेल्या त्रुटीबाबत विभागीय सचिव, व संबंधित अधिकाऱ्यांची साक्ष घेतली.

सहावी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २० मार्च, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

उपस्थिती :

(१) डॉ. अशोक उईके, वि.स.स.तथा समिती प्रमुख
(२) श्री. प्रभुदास भिलावेकर,वि.स.स.
(३) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.
(४) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.
(५) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

(१) श्री.राजेश तारवी, उप सचिव,
(२) श्री.संजय कांबळे, अवर सचिव, (समिती)
(३) श्री.दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

समितीने या बैठकीत प्रारूप अहवालावर विचार केला व तो आवश्यक त्या सुधारणासह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई